POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-९१ ● मुंबई, सोमवार, ०३ नोव्हेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## भारताशी पंगा घेणाऱ्या अमेरिकेला सर्वात मोठा झटका!

# कापड, रत्ने, दागिने... भारताची निर्यात वाढली

### सागरी उत्पादनांमध्ये किती वाढ?

आकडेवारीनुसार, जानेवारी ते सप्टेंबर २०२५ दरम्यान भारताच्या सीफूड निर्यातीत मागील वर्षाच्या तुलनेत १५.६ टक्क्यांनी वाढ झाली, जी एकूण ४.८३ अब्ज डॉलर्स इतकी झाली. ही वाढ प्रामुख्याने अमेरिकेव्यतिरिक्त इतर देशांमध्ये सीफूडच्या वाढत्या मागणीमुळे झाली. जरी अमेरिका ही सीफूड निर्यातीची सर्वात मोठी बाजारपेठ राहिली असली तरी, भारताने १.४४ अब्ज डॉलर्सची निर्यात केली असली तरी, व्हिएतनाम (१००.४ टक्के), बेल्जियम (७३.० टक्के) आणि थायलंड (५४.४ टक्के) मध्ये सर्वात जास्त वाढ दिसून आली. यावरून असे दिसून येते की भारत आशिया आणि युरोपमधील अनेक देशांमध्ये आपला सीफूड व्यापार वाढवत आहे. चीन (९.८ टक्के), मलेशिया (६४.२ टक्के) आणि जपान (१०.९ टक्के) मध्येही वाढ झाली. पेरू आणि नायजेरियासारख्या नवीन आणि उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये भारताची कापड निर्यात वाढली आहे. जानेवारी ते सप्टेंबर २०२५ पर्यंत, भारताच्या कापड निर्यातीत १.२३ टक्के इतकी माफक पण सकारात्मक वाढ झाली, जी एकूण २८.०५ अब्ज डॉलर होती. ही वाढ अमेरिकेव्यतिरिक्त इतर देशांमध्ये असलेल्या मजबूत मागणीमुळे झाली. संयुक्त अरब अमिराती (वअए) मधील निर्यातीत ८.६ टक्के १३६.५ दशलक्ष डॉलरने वाढ झाली. ज्यामुळे ते भारतीय कापडांसाठी एक महत्त्वाचे प्रादेशिक केंद्र म्हणून स्थापित झाले. युरोप, उत्तर आफ्रिका आणि मध्य पूर्वेमध्येही भारतीय कापडांची मागणी वाढत आहे. नेदरलँड्समध्ये ११.८ टक्के, पोलंडमध्ये २४.१ टक्के, स्पेनमध्ये ९.१ टक्के आणि इजिप्तमध्ये २४.५ टक्के वाढ नोंदवण्यात आली.

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

अमेरिकन बाजारपेठेत नसलेल्या देशांमध्ये आता भारतीय उत्पादनांची मागणी वाढली आहे. भारतावर शुल्क लादल्यापासून अमेरिकन बाजारपेठेत नसलेल्या देशांना होणारी निर्यात वाढली आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर कर लादल्यापासून अमेरिकेतील निर्यात घटली आहे. भारतातील कापड, रत्ने, दागिने आणि सागरी उत्पादनांवर चांगलाच परिणाम होईल. तथापि, हे प्रमाण कमी आहे. जेव्हा अमेरिकेने शुल्काद्वारे भारतासाठीचे दरवाजे बंद केले तेव्हा इतर देशांनी भारतीय उत्पादनांचे स्वागत केले. अमेरिकेव्यतिरिक्त इतर देशांना भारताच्या कापड, रत्ने, दागिने आणि सागरी उत्पादनांच्या निर्यातीत लक्षणीय वाढ झाली आहे.

वाणिज्य मंत्रालयाच्या आकडेवारीवरून माहिती उपलब्ध आहे. यावरून असे दिसून येते की भारत विविध देशांना आपला माल विकत आहे आणि तो केवळ अमेरिकेवर अवलंबून नाही. युएई, व्हिएतनाम, बेल्जियम आणि सौदी अरेबियासारख्या देशांमध्ये या उत्पादनांची मागणी वाढली आहे. आशिया, युरोप आणि पश्चिम आशियामध्ये वाढत्या मागणीमुळे या प्रदेशांना भारताच्या निर्यातीत लक्षणीय वाढ झाली आहे.



### रत्ने आणि दागिन्यांची मागणी कुठे वाढली?

या वर्षाच्या पहिल्या सहामाहीत भारताच्या रत्न आणि दागिन्यांच्या निर्यातीत १.२४ टक्क्यांची वाढ झाली, जी एकूण २२.७३ अब्ज डॉलर्स इतकी झाली. संयुक्त अरब अमिराती (यूएई) ही रत्ने आणि दागिन्यांसाठी सर्वात मोठी बाजारपेठ राहिली, निर्यातीत ३७.७ टक्क्यांनी १.९३ अब्ज डॉलर्स वाढ झाली.

दक्षिण कोरियामध्ये १३४ टक्के, सौदी अरेबियामध्ये ६8 टक्के आणि कॅनडामध्ये ४१ टक्के वाढ झाली. हे उदयोन्मुख लक्झरी आणि गुंतवणूक-केंद्रित बाजारपेठांमध्ये भारतीय दागिने आणि कापलेल्या आणि पॉलिश केलेल्या हिऱ्यांच्या वाढत्या मागणीचे प्रतिबिंब आहे.

## एकादशीच्या दिवशी वेंकटेश्वर मंदिरात मोठी दुर्घटना!

**■मुंबई। प्रतिनिधी,**

आंध्र प्रदेशातील श्रीकाकुलम येथील एका मंदिरात चेंगराचेंगरी होऊन दुर्घटना घडली आहे. या चेंगराचेंगरीत ९ भाविकांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये बहुतेक महिला आणि मुलांचा समावेश आहे. हिंदूंसाठी शुभ असलेल्या एकादशीनिमित्त कासीबुग्गा येथील वेंकटेश्वर स्वामी मंदिरात प्रचंड गर्दी झाली होती. समोर



आलेल्या व्हिडीओंमधून मैदानात तुफान गर्दी झाल्याचं दिसत आहे. शेकडो महिला स्वतःला वाचवण्यासाठी पायऱ्यावंर धडपडत असल्याचंही दिसत आहे. यानंतर मंदिर परिसरात अनेक मृतदेह विखुरलेले दिसले. नंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे आणि भाविकांच्या मृत्यूची दुर्घटना मन हेलावणारी असल्याचं म्हटलं आहे.

## परळ आणि प्रभादेवीला जोडणाऱ्या एल्फिन्स्टन पूलाचे पाडकाम रात्रीपासून

**■मुंबई। प्रतिनिधी,**

परळ आणि प्रभादेवीला जोडणारा मुंबईचा ऐतिहासिक ११२ वर्षे जुना एल्फिन्स्टन पूल पाडण्याचा अंतिम टप्पा रविवारी रात्री सुरू होणार आहे. महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन च्या अधिकाऱ्यांनी पुष्टी केली की पुलाच्या रेल्वे भागाचे पाडण्याचे काम जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. १९१३ मध्ये बांधलेला आणि मूळतः परळ पूल म्हणून ओळखला जाणारा हा पूल सुरक्षेच्या कारणास्तव १२ सप्टेंबर रोजी वाहन वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. गेल्या सात आठवड्यांपासून, मार्ग पूर्णपणे काढून टाकण्यात आले आहेत, त्यामुळे सक्रिय रेल्वे मार्गावरून जाणारा १३२ मीटरचा भाग शिल्लक आहे. या



रविवारी, आम्ही रुळांच्या वरील भाग पाडण्यासाठी लोक आणि यंत्रसामग्री एकत्रित करू, असे हिंदुस्तान टाईम्सने उद्धृत केले आहे. शिवडी-वरळी एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या बांधकामाच्या दृष्टीने हे एक पाऊल आहे. कॉरिडॉरचे उद्दिष्ट सेनापती बापट रोड आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोडला खालच्या डेकवर आणि वांद्रे-वरळी सी लिंकला वरच्या डेकवर मुंबई ट्रान्स हार्बर लिंकशी जोडले जाईल.

## सलग सातव्या महिन्यातही पाऊसधाराच... थंडी मात्र गायब! कधीही न पाहिल्यासारखा असेल यंदाचा नोव्हेंबर

**■मुंबई। प्रतिनिधी,**

ऑक्टोबर महिना सरला तरीही अद्याप पावसाने माघार घेतली नाहीये. ५ नोव्हेंबरपर्यंत पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. साधारणतः ऑक्टोबरमध्ये उन्हाची तीव्रता जास्त असते आणि ऑक्टोबर सरताना थंडीची चाहुल लागते. मात्र यंदा वातावरणाचे वारे फिरले आहेत. ऑक्टोबर महिनाही पावसातच गेल्याने तापमानात सतत चढ-उतार होताना दिसत होते. नोव्हेंबरमध्येही थंडीची चाहुल लागण्याऐवजी पावसाच्या सरी बरसतायेत. त्यामुळं यंदा नोव्हेंबरमध्ये थंडी जाणवणार की नाही? असा प्रश्न निर्माण होत आहे.

नोव्हेंबर महिन्यात राज्यात किमान तापमान सरासरीच्या तुलनेत अधिक राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. त्यामुळं नोव्हेंबर महिन्यात थंडी




कमी असेल, अशी शक्यताही वर्तवण्यात आली आहे. याचबरोबर देशातील अनेक भागांत किमान तापमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याचा अंदाज आहे. दरम्यान, नोव्हेंबर महिन्यात राज्याबरोबरच संपूर्ण देशात सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता आहे.

नोव्हेंबर महिन्यातील कमाल, किमान तापमान आणि पाऊस याचा अंदाज वर्तविण्यासाठी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी नोव्हेंबरचा अंदाज सादर केला. यावेळी नोव्हेंबर महिन्यात वायव्य भारताचा काही भाग वगळता देशाच्या अनेक भागांत किमान तापमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

राज्यात किमान तापमान अधिक राहणार असल्याने नोव्हेंबर महिन्यात फारशी थंडी पडणार नाही. याचबरोबर राज्यासह मध्य भारत, वायव्य भारतात कमाल तापमान सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.




### राज्यातील 'या' भागात विजांसह कोसळणार पाऊस

नोव्हेंबर महिना संपत आला तरी अद्यापही पावसाची रिपरिप सुरूच आहे. आज सकाळपासूनच मुंबई व उपनगरात पावसाने हजेरी लावली आहे. तर, उर्वरित राज्यातही पावसाची शक्यता वर्तवली जात आहे. दोन्ही समुद्रातील कमी दाब क्षेत्रांचा प्रभाव कमी झाल्याने राज्यात पावसाचा जोर कमी होणार आहे. मात्र आज दक्षिण कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी विजांसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. उर्वरित राज्यात ढगाळ आकाशासह कमाल-किमान तापमानात चढ-उतार होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. आज सकाळपासूनच मुंबई व उपनगरात पावसाची रिपरिप सुरू आहे. त्यामुळं येथे ढगाळ वातावरण आहे. तर आज कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मध्य महाराष्ट्रातील नंदूरबार, धुळे, जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सातारा, कोल्हापूर, मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड परभणी, लातूर, नांदेड या जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर राज्यातील उर्वरित भागात ढगाळ हवामानासह वातावरणात चढ-उतार होण्याची शक्यता वर्तवली आहे.

## ९ मित्रांनी जेवायला बोलवलं अन् तिथेच घात केला... पुरावे मिळू नये म्हणून अमानुष प्रकार

**■मुंबई। प्रतिनिधी,**

अक्षय नागलकर 22 ऑक्टोबरला आपल्या एका मित्रासोबत बाहेर गेला. मित्रावर विश्वास असल्याने अक्षय बिंधास्त त्याच्यासोबत एका धाब्यावर जेवण करायला सुद्धा गेला आणि अक्षय सोबत नऊ जणांनी घात करून त्याची हत्या केली.

अक्षय घरी परतला नसल्याने आईने अकोला शहरातील डाबकी रोड पोलीस ठाण्यात अक्षयच्या बेपत्ता होण्याची तक्रार दिली आणि प्रकरणातील रहस्य अखेर उघड झाले. तब्बल तीन दिवसां नंतर बेपत्ता असलेला अक्षय नागलकरला त्याच्याच ९ मित्रांनी निर्दयपणे जाळून ठार केल्याचं समोर आलं.

### काय आहे नेमकी संपूर्ण घटना?

अक्षय नागलकर २२ ऑक्टोबरपासून बेपत्ता होता.त्याच्या कुटुंबीयांनी अकोला शहरातील डाबकी रोड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. पोलिस यंत्रणांनी त्याचा तीन दिवस शोध घेतला. दरम्यान, अकोला जिल्ह्यातील मोरगाव भाकरे परिसरात अक्षयला मारून जाळल्याचं धक्कादायक वास्तव समोर आलं. या घटनेमुळे अकोला शहरात मोठा संताप उसळला. पोलिसांच्या प्राथमिक




तपासानुसार, आरोपींनी अक्षयला एका धाब्यावर जेवणासाठी बोलावलं आणि त्यानंतर त्याच्या डोळ्यात मिरची पावडर टाकून धारदार शस्त्राने त्याच्यावर वार केले. त्यानंतर आरोपींनी अक्षयचा मृतदेह शेतशिवारातील एका टीनच्या शेडमध्ये नेऊन पुरावे नष्ट करण्याच्या हेतूने जाळून टाकला. इतकंच नव्हे तर आरोपी मृतदेहाची राख पूर्णतः नष्ट होईपर्यंत तिथेच थांबले आणि नंतर ती राख गायब करून संपूर्ण टीन शेड रंगवून टाकली.

### कोण होता अक्षय नागलकर?

अक्षय नागलकर हा गोरक्षक आणि हिंदुत्ववादी कार्यकर्ता म्हणून ओळखला जात होता. त्याच्या खुनामागे वैयक्तिक वाद असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांकडून समोर आली आहे. या प्रकरणात पोलिसांनी सुरुवातीला चार आरोपींना ताब्यात घेतलं. या मध्ये मुख्य आरोपी असलेल्या चंद्रकांत बोरकरचा ही समावेश होता. पोलिसांनी उर्वरित पाच आरोपींचा शोध सुरू ठेवला, यानंतर चार आणखी आरोपींना पोलिसांनी जेरबंद केलं तर एक आरोपी फारच राहिला. शेवटी पोलिसांच्या अथक प्रयत्नानंतर शेवटच्या आरोपीपर्यंत ही पोलीस पोहोचली आणि या हत्याकांडातील नवही आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश मिळालं.

### पोलीस तपासा आतापर्यंत काय निष्पन्न झालं ?

पोलिसांनी आतापर्यंत अक्षय नागरकर हत्याकांड प्रकरणात नऊ आरोपींना अटक केली आहे. आरोपींनी खुनाची कबुली दिली असून अकोल्यातील मोर्णा नदी पात्रातून पोलिसांनी बंदुकीच्या गोळीचा वापरलेला काडतूस तर बाळापूर येथील नदी नदीपात्रातून हाडांचे तुकडे शोधून काढल्याचा दावा केला आहे, जे तपासासाठी अत्यंत महत्वाचे ठरणार आहेत. या घटनेचे नियोजनपूर्वक स्वरूप लक्षात घेता, पोलिसांसमोर या प्रकरणाचा तपास अधिकच गुंतागुंतीचा ठरण्याची शक्यता आहे. पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न, आरोपींची संख्या आणि अत्यंत अमानुष पद्धतीने केलेली हत्या या सगळ्या गोष्टींमुळे हे प्रकरण अधिक संवेदनशील बनले आहे. अकोला पोलिसांकडून या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून, पुढील तपासात आणखी काही महत्वाचे तपशील समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात

### पोलिसांसामोर आव्हान..

रहस्यमय आणि क्रूर अशा दोन्ही शब्दांचा प्रत्यय देणाऱ्या या प्रकरणामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या भीषण हत्याकांडानंतर पोलिसांसमोर तपासाचं मोठं आव्हान उभं राहिलं आहे. आरोपींचा हेतू, खुनामागचं कारण आणि मृतदेहाशी संबंधित सत्य हे सर्व उघड करण्यासाठी पोलिसांची कसोटी लागणार आहे.

## तो स्वतःला संपवणार होता, पोलिसांच्या सतर्कतेने जिंकले मन!

**■पुणे। प्रतिनिधी,**

सध्या सोशल मीडियावर पुण्यातील पोलिसांचा एक व्हिडीओ व्हायरल होताना दिसत आहे. हा व्हिडीओ पाहून अनेकांनी पुणे पोलिसांचे कौतुक केले आहे. व्हिडीओमध्ये पाहायला मिळते की एक वृद्ध व्यक्ती भांडणाला कंटाळून फाशी घेण्याचा प्रयत्न करत आहे. तेवढ्यात घटनास्थळी पोलिस पोहोचली. त्यांच्या सतर्कतेमुळे ज्येष्ठ नागरिकाचा जीव वाचला आहे.

१ मिनिट १५ सेकंदांच्या या व्हायरल व्हिडीओत पोलिस घराचा दरवाजा तोडताना दिसत आहेत. व्हिडीओच्या सुमारे १६ व्या सेकंदाला पोलिस दरवाजा तोडून घरात प्रवेश करतात. त्यांना येथे एक व्यक्ती फाशीच्या फंद्याने लटकलेला दिसतो. त्यानंतर पोलीस कर्मचारी त्याला फंद्यातून खाली उतरवून जमिनीवर झोपवतात आणि त्याला CPR देण्यास सुरुवात करतात.

ही घटना पुणे जिल्ह्यातील महंमदवाडीच्या कृष्णानगर भागातील आहे. बुधवारी महंमदवाडी बीट मार्शल पोलीस नाईक बुधवारे आणि पोलीस शिपाही थोरात यांना डायल ११२ वर एक कॉल आला. फोनवरुन माहितीदेण्यात आली की एका दांपत्यात साधे भांडण झाले आहे आणि ज्येष्ठ व्यक्ती स्वतःला संपवण्याचा प्रयत्न करत आहे. माहिती मिळताच पोलिस ताबडतोब घटनास्थळी पोहोचले. तेथे पोहोचल्यावर कळले की ६० वर्षीय बालाजी गंगाराम मेहत्रे यांनी घराचा दरवाजा आतून बंद करून घेतला आहे आणि फाशी लावण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यानंतर पोलिसांनी वेळ न दवडता ताबडतोब दरवाजा तोडण्यास सुरुवात केली, जेणेकरून ते वेळेवर घरात पोहोचून व्यक्तीचा जीव वाचवू शकतील.



### पोलिसांची होत आहे स्तुती

काही वेळातच वृद्ध व्यक्ती श्वास घेण्यास सुरूवात करते. पोलीस कर्मचाऱ्यांनी त्यांना ताबडतोब रिक्षात बसवून रुबी हॉल हॉस्पिटलमध्ये नेले. नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार, सध्या बालाजी गंगाराम मेहत्रे यांची प्रकृती स्थिर आहे आणि ते धोक्याबाहेर आहेत. आता काळेपडळ पोलिसांच्या बीट मार्शलच्या या त्वरित कारवाईचा व्हीडिओ व्हायरल होत आहे आणि लोक त्यांच्या या कामाची प्रशंसा करत आहेत.




सोशल मीडियावर आली 'प्रेग्नंट जॉब' जाहिरात

## मला प्रेग्नेंट करणाऱ्याला देणार २५ लाख, पुण्याच्या कॉन्ट्रॅक्टरला महिलेची अजब ऑफर... करारातील अटी वाचून सगळेच थक्क!

**■पुणे। प्रतिनिधी,**

पुण्यातील एका ४४ वर्षीय कंत्राटदाराला सोशल मीडियावर असा एक व्हिडीओ दिसला ज्याने त्याच्या आयुष्यात उलथापालथ करून टाकली. व्हिडीओमध्ये एक महिला होती, जी खूप गंभीर आवाजात म्हणत होती- 'मला असा माणूस हवा जो मला आई बनवू शकेल. मी त्याला २५ लाख रुपये देईन. मला त्याची जात, रंग किंवा शिक्षण याच्याशी काही देणे-घेणे नाही.' आता नेमकं काय झालं? जाणून घ्या...

पुण्यातील कंत्राटदाराने पाहिलेला हा व्हिडिओ ''Pregnant Job'' नावाच्या पेजवर टाकला होता. कंत्राटदाराला ही गोष्ट आधी तर विचित्र वाटली, पण २५ लाखांच्या आमिषाने त्याने व्हिडिओमध्ये दिलेल्या नंबरवर फोन केला. पुढे जे झालं ते ऐकून पोलिसांच्या पायाखालची जमीनच सरकली.

फोन उचलणाऱ्या व्यक्तीने स्वतःला ह्यप्रेग्नेंट जॉबह्य कंपनीचा असिस्टंट सांगितले. त्याने कंत्राटदाराला सांगितले की या कामासाठी त्याला आधी कंपनीमध्ये नोंदणी करावी लागेल, तेव्हाच त्याला आयडी कार्ड आणि इतर आवश्यक कागदपत्रे मिळतील. त्यानंतर पैशांचा खेळ सुरू झाला. आधी नोंदणी फी, नंतर आयडी कार्डचा चार्ज, नंतर व्हेरिफिकेशन, जीएसटी, टीडीएस, प्रोसेसिंग फीङ्क प्रत्येक वेळी काही ना काही नवे बहाणे काढले गेले.

### १०० पेक्षा जास्त व्यवहारांत गेले ११ लाख रुपये

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, कंत्राटदाराने सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून ते २३ ऑक्टूबरपर्यंत सुमारे १०० पेक्षा जास्त वेळा ऑनलाइन ट्रान्सफर केले, कधी वढकने, कधी क्टढर ने. एकूण रक्कम होती सुमारे ११ लाख रुपये. सुरुवातीला त्याला विश्वास दिला की ''सर्व काही प्रक्रियेत आहे'' आणि लवकरच त्याची महिलेशी भेट घालून दिली जाईल. पण जसे कंत्राटदाराने प्रश्न विचारायला सुरुवात केली, तसे समोरच्या नंबरने त्याला ब्लॉक केले.

### पोलिसांत तक्रार, तपास सुरू

फसवणुक झाल्याचे कळताच कंत्राटदाराने बनर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी आता त्या मोबाईल नंबरांची आणि बँक खात्यांची तपासणी सुरू केली आहे ज्यात पैसे पाठवले गेले होते. एका तपास अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार, ''ही चोरी फक्त पुण्यापुरती मर्यादित नाही. देशाच्या अनेक भागांतून अशी प्रकरणे समोर येत आहेत. सोशल मीडियावर बनावट व्हिडीओ टाकून लोकांना मोठ्या पैशांचे आमिष दाखवले जाते आणि नंतर वेगवेगळ्या नावांनी पैसे उकळले जातात.''

### देशभरात पसरलेला प्रेग्नेंट जॉब स्कॅम

सायबर तपासकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, अशा प्रकारचे व्हिडिओ २०२२ च्या शेवटापासून देशातील अनेक राज्यांत व्हायरल होत आहेत. बिहार, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशसारख्या राज्यांत अनेकांना याच पद्धतीने मूर्ख बनवले गेले आहे. काही प्रकरणांत चोरांनी स्वतःला ''Pregnant Job Service'' किंवा ''Motherhood Job Agency'' सारख्या नावांनी सादर केले. व्हिडीओमध्ये महिलांच्या क्लिप्स टाकून हे दाखवले जाते की त्या खरंच एखाद्या पुरुषाच्या शोधात आहेत जो त्यांना आई होण्यास मदत करेल. नंतर बोलणे नोंदणी आणि मेडिकल टेस्टच्या फीपर्यंत पोहोचते. पैसे मिळताच चोर पसार होतात.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# समाजमन मरणपंथाला लागलेय का?



**किमान मृत्यूनंतर तरी आपल्याला न्याय मिळेल या भाबड्या आशेने ज्या कोवळ्या जीवाने तळहातावर ज्यांच्या पापाचा हिशेब मांडत आपला जीव सोडला, तेच आता तिच्या निस्तेज देहाच्या चिंधड्या करत आहेत.**

गेले काही दिवस फलटणमधील महिला डॉक्टरच्या आत्महत्येने महाराष्ट्राचे राजकीय-सामाजिक वातावरण ढवळून निघाले आहे. बीडसारख्या ऊसतोड मजुरांचा जिल्हा म्हणून ओळख बनलेल्या प्रदेशातून एका गरीब शेतकरी कुटुंबातील मुलगी स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर एमबीबीएसचे शिक्षण घेते आणि सातारा जिल्ह्यातील फलटणसारख्या प्रस्थापित जिल्ह्यात शल्यचिकित्सक म्हणून रूजू होते ही छोटी गोष्ट नाही. पण हीच गोष्ट तिच्या मृत्यूचे कारण बनेल हे प्रत्यक्ष त्या डॉक्टरला किंवा तिच्या आप्तस्वकियांना माहीत नव्हते. पण हेच सत्य आहे. सचोटीने सेवाधर्म निभावताना तिला आपला जीव गमवावा लागला. मात्र मृत्यूनंतरही तिचे शुक्लकाष्ठ संपायला तयार नाही. किमान मृत्यूनंतर तरी आपल्याला न्याय मिळेल या भाबड्या आशेने ज्या कोवळ्या जीवाने तळहातावर ज्यांच्या पापाचा हिशेब मांडत आपला जीव सोडला तेच तिच्या निस्तेज देहाच्या चिंधड्या करत आहेत. बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील कवडगाव बुद्रुक या गावातील मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबातील ही डॉक्टर तरुणी दोन वर्षांपूर्वी फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयात कंत्राटी वैद्यकीय अधिकारी म्हणून रूजू झाली होती. कामामध्ये ती अतिशय तत्पर, प्रामाणिक व वक्तशीर होती, असे तिचे सहकारी सांगतात. तिच्या कार्यकाळात एकाही रुग्णाने रुग्णसेवेबद्दल तक्रार केली नव्हती ही तिच्या कामाची पोचपावती होती. मात्र हाच तिचा प्रामाणिकपणा व्यवस्थेच्या आड येत होता. तिच्यावर रुग्ण तपासणीबरोबरच शवविच्छेदनाचीही जबाबदारी होती. अनेक वेळा पोलिसांनी आणलेल्या आरोपींची वैद्यकीय तपासणी करून फिट-अनफिट रिपोर्ट द्यावे लागत असत. मात्र बऱ्याच वेळा आरोपींची तब्येत ठीक नसतानाही फिट रिपोर्ट द्यावे म्हणून पोलीस डॉक्टरांवर दबाव टाकत असत. मात्र डॉक्टर योग्य तोच रिपोर्ट देत असल्याने पोलिसांची अडचण होत असे. त्यात माजी खासदाराकडून व पीएकडून सोईचे रिपोर्ट मिळण्यासाठीही दबाव टाकला जात होता. तसेच रात्री-अपरात्री आणलेल्या मृतदेहावर तातडीने पोस्टमॉर्टेम करण्यासाठी व रिपोर्टसाठी दबाव टाकत असत. रात्री उशिरा पोस्टमॉर्टेम करणे योग्य नाही, असे डॉक्टरांचे म्हणणे होते. यातून डॉक्टर व पोलिसांमध्ये संघर्ष सुरू होता. याविषयी जून व ऑगस्ट २०२५ मध्ये डॉक्टरांनी आपला छळ होत असल्यामुळे डीवायएसकडे तक्रार केली होती. मात्र कारवाई होत नसल्याने त्यांनी माहितीच्या अधिकाराखालीही माहिती मागवली होती. तरीही सहकार्य मिळत नसल्याने अखेर त्यांनी चार पानांचा तक्रार अर्ज सातारा जिल्हा शल्य चिकित्सकांना केला होता. इतके होऊनही डॉक्टरांना तपासात कुठलेही सहकार्य मिळाले नाही. उलट पोलिसांनी केलेल्या तोंडी तक्रारीवर जिल्हा शल्य चिकित्सकांनी डॉक्टरांकडूनच खुलासा मागवला होता व हे प्रकरण मिटवायला सांगितले. या सगळ्या प्रकरणात न्याय मिळत नसल्याने त्या प्रचंड मानसिक तणावाखाली होत्या. त्यातच त्या राहात असलेली खोली घरमालकाने लॉक लावून बंद केली. त्यामुळेच डॉक्टरांना मध्यरात्री दीड वाजता हॉटेलचा आश्रय घावा लागला. २३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सातच्या सुमारास डॉक्टर तरुणीने आत्महत्या केल्याची नोंद पोलिसांनी केली. ऐन दिवाळीच्या दिवशी सगळीकडे आनंदोत्सव साजरा होत असताना या हुरहुन्नरी-लढवय्या डॉक्टरने आत्महत्या करणे जितके धक्कादायक आहे, तितकेच संशयाला वाव देणारे आहे. हॉटेलमालकाच्या म्हणण्यानुसार, डॉक्टर तरुणीने बारामतीला जायला उशीर झाल्याने रात्री दीड वाजता येऊन हॉटेलमध्ये रूम मागितली आणि सकाळी लवकर हॉटेल सोडणार असल्याचे सांगितले होते. तसेच सकाळी ११ वाजता आम्ही दार ठोठावले, पण दार न उघडल्याने दुपारी व संध्याकाळी पुन्हा दार ठोठावले. पण तरीही दार न उघडल्याने सायंकाळी ६ वाजून ४५ मिनिटांनी स्वतःच्या उपस्थितीत डुप्लिकेट चावीने दार उघडल्यावर सदर तरुणी पंख्याला गळफास लावलेल्या अवस्थेत दिसल्याचे हॉटेल मालक रणजित भोसले यांनी सांगितले. हा सगळा प्रकारच संशयास्पद आहे. रात्री १.३० वाजता आलेली तरुणी दिवाळीच्या दिवशी सकाळी आणि दुपारी दार उघडत नसल्यावर व जेवायलाही बाहेर न आल्यावर हॉटेल मालकाने तत्काळ पोलिसांना कळवायला पाहिजे होते व पोलिसांच्या उपस्थितीत दार उघडायला पाहिजे होते. पण हॉटेलवाल्यांनी संध्याकाळी साडेसहा वाजता दार उघडून तब्बल १७ तासांनंतर पोलिसांना बोलावले. पोलिसांनीही बॉडी ताब्यात घेऊन हॉस्पिटलला पोस्टमॉर्टेमसाठी पाठवली. ''मी बहिणीच्या मोबाईलवर फोन केल्यावर तो फोन उचलून तुमच्या बहिणीने आत्महत्या केल्याचे पोलिसांनी आम्हाला सांगितले, मात्र घटना घडल्यावर उशिरापर्यंत आम्हाला काही सांगितले नाही,'' असे मयत डॉक्टरच्या भावाचे म्हणणे आहे. ''माझ्या मरणाचे कारण पोलीस निरीक्षक गोपाल बदने, ज्याने माझ्यावर ४ वेळा रेप केला आणि प्रशांत बनकर ज्याने ४ महिने शारीरिक व मानसिक छळ केला'', असे मयत तरुणीने हातावर लिहिले होते. हे पोलिसांना पोस्टमॉर्टेमच्या वेळी दिसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. जी मुलगी गेले वर्षभर व्यवस्थेविरुद्ध लढते आहे, लेखी तक्रारी करते आहे ती आत्महत्या करेल आणि केली तरी त्याची लेखी चिठ्ठी लिहिणार नाही ही केवळ अशक्यप्राय गोष्ट आहे. पोलिसांनीच पुरावे नष्ट केले नसतील कशावरून? या संशयालाही जागा आहे. पोलीस यंत्रणेने दबाव टाकल्याचे व त्रास दिल्याची लेखी तक्रार मयत डॉक्टरांनी वरिष्ठांकडे केली होती. माहितीचा अधिकार टाकूनही कारवाई झाली नाही. पोलीस अधीक्षकांपर्यंत याची माहिती होती. या तक्रारीची वेळीच योग्य दखल घेतली असती व कारवाई झाली असती तर एक निष्पाप जीव वाचला असता. आता वरिष्ठांपर्यंत जी पोलीस यंत्रणा आरोपीच्या पिंजऱ्यात आहे तीच यंत्रणा याचा तपास करत आहे ते अतिशय धक्कादायक आणि धोकादायक आहे. राज्याच्या गृहमंत्र्यांनी या संवेदनशील प्रकरणात तत्काळ लक्ष घालून पोलीस अधीक्षक दोषीसहित सगळ्याच दोषींना तत्काळ निलंबित करून तपासासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) नेमायला पाहिजे होती. सत्ताधारी वर्गातील एक मोठा गट या मुलीला बदनाम करण्यासाठी आणि बदचलन ठरवण्यासाठी मोहीम चालवत आहे. मृत्यूनंतरही लेकी-बाळींनाच आपल्या चारित्र्यावरून अग्निपरीक्षेला सामोरे जावे लागत आहे, ही क्रूर थट्टा आहे. पोलिसांचा तपास सुरुवातीपासून संशयाच्या घेऱ्यात आहे तिथे न्याय कसा मिळणार? मोजके अपवाद सोडले, तर विरोधी पक्ष सावध पावले टाकताना दिसत आहे. महिला आयोगाची भूमिका अत्यंत संशयास्पद आहे. राज्यातील इतर सामाजिक संस्था, संघटना, महिला संघटना तसेच डॉक्टर संघटनांही फारसा आवाज उठवताना दिसत नाहीत. आमचे समाजमन हळूहळू मरतेय का या शंकेला वाव यावा इतपत परिस्थिती गंभीर आहे. त्या निष्पाप डॉक्टर मुलीला आपल्याकडून न्यायाची अपेक्षा नव्हती म्हणूनच तिने आत्महत्या करून आपली सुटका करून घेत या जगाचा निरोप घेतला. आम्ही मात्र 'तुला न्याय देणारच नाही' या गोष्टीवर शिक्कामोर्तब करतोय इतकंच..!! जी यंत्रणा मृत डॉक्टर मुलीलाच दोषी ठरवण्यासाठी कामाला लागली आहे, तिला आता मात्र काही फरक पडणार नाही, कारण ती मेलीय.. तिचा आत्मा हरवून गेला आहे... आता लढाई आपल्या आत्म्याची आहे..!

# शेतकऱ्यांना कर्जमाफीचा दिलासा मिळणार?

**महायुती सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी उच्चाधिकार समिती स्थापन केली; या आधीही शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी समित्या स्थापन केल्या. मात्र समित्यांचा अहवाल गुलदस्त्यात राहिला आहे. अहवालानंतर शेतकरी कर्जमुक्त होईल का?**



राज्यात सुमारे ९५ लाखांहून अधिक शेतकरी बांधव आहेत. बळीराजा हा जगाचा पोशिंदा, परंतु याच शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न आजही न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. यापैकी एक म्हणजे कर्जमाफी. माजी मंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी आंदोलनांचे हत्यार उपसले आणि अखेर महायुती सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी उच्चाधिकार समिती स्थापन केली. मात्र शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी नेमलेली ही समिती पहिली समिती आहे असे नाही. या आधीही शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी समित्या स्थापन केल्या. मात्र या समित्यांचा अहवाल आजही गुलदस्त्यात राहिला आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालानंतर शेतकरी कर्जमुक्त होईल का, हे पुढील सहा महिन्यांनी स्पष्ट होईलच.

शेतकऱ्यांची कर्जमाफी ही मागणी काही एका रात्रीच उगम पावली असे नाही. शेतकऱ्यांची कर्जमाफी हा मुद्दा राजकीय नेत्यांनी कायमच लावून धरला आहे. निवडणुका जवळ आल्या की, शेतकऱ्यांची कर्जमाफी, दर्जेदार आरोग्य सुविधा, खड्डेमुक्त रस्ते हे विषय सत्ताधारी असो वा विरोधक लावून धरतात. माजी मंत्री बच्चू कडू यांनी कर्जमाफीसाठी आंदोलनाचे हत्यार उपसले आणि राज्य सरकार खडबडून जागे झाले. तातडीने उच्चाधिकार समिती स्थापन करत ३० जून २०२६ पर्यंत अहवाल सादर करण्याचे निर्देश समितीला दिले. समितीचा अहवाल काय असेल तो असेल परंतु शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी स्थापन केलेली ही समिती पहिलीच आहे का, याधीच्या समितींनी दिलेल्या अहवालाचे काय, असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी होणार की, नंतर सगळं थंडबस्त्यात जाणार, हे पुढील काही महिन्यांत स्पष्ट होईलच. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची आर्थिक अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. कर्जबाजारीपणा, अवकाळी पाऊस, बाजारभावातील अस्थिरता आणि विमा योजनांतील अकार्यक्षमता या साऱ्यामुळे शेतकरी आत्महत्यांच्या घटना थांबत नाहीत.

या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा अभ्यास करण्यासाठी मित्राचे संस्थापक प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. या समितीचा उद्देश ''शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी शाश्वत आराखडा'' तयार करणे, असे सांगण्यात आले. मात्र शेतकऱ्यांच्या मनात आजही तीव्र नाराजी असून यापूर्वीही अशाच अनेक समित्या स्थापन होऊन त्यांचा अहवाल धूळखात पडला आहे. त्यामुळे परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालाचा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी उपयोग होतो की या समितीचा हा अहवाल गुलदस्त्यात राहणार की शेतकरी हिताचा हे ३० जून २०२६ पर्यंत स्पष्ट होईलच.

सरकारच्या या समित्या म्हणजे फसवे आश्वासनांचा मुखवटा. कर्जमाफीसाठी कोणत्याही ठोस निर्णयाऐवजी 'अभ्यास समिती' नेमण्यामागे उद्देश फक्त वेळकाढूपणा आणि निवडणुकीपूर्व राजकीय प्रतिमा वाचविणे हा आहे. प्रवीण परदेशी यांच्या नेतृत्वाखालील समिती शेतकऱ्यांना खरी मदत करेल का, की आणखी एका अहवालापुरतीच मर्यादित राहील, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. याआधीही अनेक उच्चाधिकार समित्यांचे अहवाल मंत्रिमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आले. मात्र आजही त्या अहवालाचे काय झाले हे गुलदस्त्यातच आहे. सरकारला जर खरोखर शेतकऱ्यांना दिलासा द्यायचा असेल, तर समित्या नव्हे तर थेट धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे. शेतकऱ्यांची कर्जमुक्ती, शेतीमालाला हमीभाव, विमा दाव्यांची जलद निकाली प्रक्रिया आणि नैसर्गिक आपत्तीतील नुकसानभरपाई या मुद्द्यांवर प्रत्यक्ष कृती झाली पाहिजे. पण त्याऐवजी उच्चाधिकार समिती स्थापन करून सरकारने शेतकऱ्यांची बोळवण तर केली नाही ना, उच्चाधिकार समिती स्थापन अहवाल गुलदस्त्यात तर विरोधकांना टीका करण्यासाठी आयते कोलीत मिळणार यात दुमत नाही.

एकूणच महायुती सरकारने शेतकऱ्यांच्या समस्येकडे आगामी निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून राजकीय चष्म्यातून पाहणे थांबवून तत्काळ अंमलबजावणीच्या पातळीवर कार्यवाही करणे गरजेचे आहे. अन्यथा या 'उच्चाधिकार समित्या' म्हणजे शेतकऱ्यांच्या वेदनांवर मीठ चोळल्यासारखे ठरेल आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये असंतोष आणखी वाढेल. शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जाऊ शकते की नाही याचे ज्ञान सत्ताधारी असो वा विरोधक दोघांना अवगत आहे. त्यामुळे आगामी निवडणुका लक्षात घेता समिती स्थापन करून पुन्हा एकदा शेतकऱ्यांना गाजर तर दाखवले नाही ना, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर निर्णय घेणे सत्ताधारी असो वा विरोधक दोघांच्याही विचारावर ठरणार आहे. त्यामुळे परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या या समितीचा अहवाल वेळोवर येईल अशी शक्यता कमीच आहे. शेतकऱ्यांना दिलासा देणारे निर्णय कागदावर राहतात आणि प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांच्या हातात पोहोचत नाही. त्यामुळे या समितीच्या स्थापनेने केवळ राजकीय गाजावाजा केला जात आहे. परंतु प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या जीवनात काही बदल होईल असे दूरवर दिसूत येत नाही. त्यामुळे समिती स्थापन करून शेतकऱ्यांची बोळवण केली तर भविष्यात शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा उद्रेक होईल आणि याला सत्ताधारी व विरोधक जबाबदार असणार यात दुमत नाही.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची अवस्था दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, कधी अवकाळी पाऊस अशा संकटांच्या चक्रव्यूहात अडकलेला शेतकरी हवालदिल झाला आहे. शेती ही जीवनाचा कणा असूनही, शेतकऱ्याला स्थैर्य देण्यात सरकारचे युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. गेल्या काही वर्षांत शेतकऱ्यांनी उत्पादन वाढवण्यासाठी खूप परिश्रम घेतले, परंतु शेतीमालाला बाजारभाव न मिळाल्याने त्यांची आर्थिक घडी विस्कटली आहे. पीक विमा योजनांच्या अंमलबजावणीत विलंब, बँकांचे कर्ज वसुलीचे दडपण, तसेच वाढते खत-औषधांचे दर ही संकटे अधिक तीव्र बनवत आहेत. त्यातच हवामान बदलामुळे पिकांची अनिश्चितता वाढली आहे. आज ग्रामीण भागात अनेक शेतकरी जगण्याची लढाई लढत आहेत.

आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची आकडेवारी हे केवळ आकडे नसून, त्यामागे उद्ध्वस्त झालेली कुटुंबे आणि तुटलेल्या स्वप्नांची कहाणी दडलेली आहे. सरकारकडून मदतीच्या घोषणा होतात, परंतु त्या प्रत्यक्षात पोहोचायला वेळ लागतो. महाराष्ट्रातील शेतकऱ्याला खऱ्या अर्थाने दिलासा मिळावा, यासाठी स्थिर व हमीभावाची धोरणे, वेळेवर विमा परतावा, तसेच कर्जमाफीसोबत शाश्वत शेतीसाठी तंत्रज्ञानाचा वापर आणि बाजारपेठेतील थेट प्रवेश आवश्यक आहे.

ज्यात सुमारे ९५ लाखांहून अधिक शेतकरी बांधव आहेत. बळीराजा हा जगाचा पोशिंदा, परंतु याच शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न आजही न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. यापैकी एक म्हणजे कर्जमाफी. माजी मंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी आंदोलनांचे हत्यार उपसले आणि अखेर महायुती सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी उच्चाधिकार समिती स्थापन केली. मात्र शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी नेमलेली ही समिती पहिली समिती आहे असे नाही. या आधीही शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी समित्या स्थापन केल्या. मात्र या समित्यांचा अहवाल आजही गुलदस्त्यात राहिला आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालानंतर शेतकरी कर्जमुक्त होईल का, हे पुढील सहा महिन्यांनी स्पष्ट होईलच.

शेतकऱ्यांची कर्जमाफी ही मागणी काही एका रात्रीच उगम पावली असे नाही. शेतकऱ्यांची कर्जमाफी हा मुद्दा राजकीय नेत्यांनी कायमच लावून धरला आहे. निवडणुका जवळ आल्या की, शेतकऱ्यांची कर्जमाफी, दर्जेदार आरोग्य सुविधा, खड्डेमुक्त रस्ते हे विषय सत्ताधारी असो वा विरोधक लावून धरतात. माजी मंत्री बच्चू कडू यांनी कर्जमाफीसाठी आंदोलनाचे हत्यार उपसले आणि राज्य सरकार खडबडून जागे झाले. तातडीने उच्चाधिकार समिती स्थापन करत ३० जून २०२६ पर्यंत अहवाल सादर करण्याचे निर्देश समितीला दिले. समितीचा अहवाल काय असेल तो असेल परंतु शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी स्थापन केलेली ही समिती पहिलीच आहे का, याधीच्या समितींनी दिलेल्या अहवालाचे काय, असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी होणार की, नंतर सगळं थंडबस्त्यात जाणार, हे पुढील काही महिन्यांत स्पष्ट होईलच. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची आर्थिक अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे.

कर्जबाजारीपणा, अवकाळी पाऊस, बाजारभावातील अस्थिरता आणि विमा योजनांतील अकार्यक्षमता या साऱ्यामुळे शेतकरी आत्महत्यांच्या घटना थांबत नाहीत. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा अभ्यास करण्यासाठी मित्राचे संस्थापक प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. या समितीचा उद्देश ''शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी शाश्वत आराखडा'' तयार करणे, असे सांगण्यात आले. मात्र शेतकऱ्यांच्या मनात आजही तीव्र नाराजी असून यापूर्वीही अशाच अनेक समित्या स्थापन होऊन त्यांचा अहवाल धूळखात पडला आहे. त्यामुळे परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालाचा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी उपयोग होतो की या समितीचा हा अहवाल गुलदस्त्यात राहणार की शेतकरी हिताचा हे ३० जून २०२६ पर्यंत स्पष्ट होईलच.

सरकारच्या या समित्या म्हणजे फसवे आश्वासनांचा मुखवटा. कर्जमाफीसाठी कोणत्याही ठोस निर्णयाऐवजी 'अभ्यास समिती' नेमण्यामागे उद्देश फक्त वेळकाढूपणा आणि निवडणुकीपूर्व राजकीय प्रतिमा वाचविणे हा आहे. प्रवीण परदेशी यांच्या नेतृत्वाखालील समिती शेतकऱ्यांना खरी मदत करेल का, की आणखी एका अहवालापुरतीच मर्यादित राहील, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. याआधीही अनेक उच्चाधिकार समित्यांचे अहवाल मंत्रिमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आले. मात्र आजही त्या अहवालाचे काय झाले हे गुलदस्त्यातच आहे. सरकारला जर खरोखर शेतकऱ्यांना दिलासा द्यायचा असेल, तर समित्या नव्हे तर थेट धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे. शेतकऱ्यांची कर्जमुक्ती, शेतीमालाला हमीभाव, विमा दाव्यांची जलद निकाली प्रक्रिया आणि नैसर्गिक आपत्तीतील नुकसानभरपाई या मुद्द्यांवर प्रत्यक्ष कृती झाली पाहिजे. पण त्याऐवजी उच्चाधिकार समिती स्थापन करून सरकारने शेतकऱ्यांची बोळवण तर केली नाही ना, उच्चाधिकार समिती स्थापन अहवाल गुलदस्त्यात तर विरोधकांना टीका करण्यासाठी आयते कोलीत मिळणार यात दुमत नाही.

एकूणच महायुती सरकारने शेतकऱ्यांच्या समस्येकडे आगामी निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून राजकीय चष्म्यातून पाहणे थांबवून तत्काळ अंमलबजावणीच्या पातळीवर कार्यवाही करणे गरजेचे आहे. अन्यथा या 'उच्चाधिकार समित्या' म्हणजे शेतकऱ्यांच्या वेदनांवर मीठ चोळल्यासारखे ठरेल आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये असंतोष आणखी वाढेल. शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जाऊ शकते की नाही याचे ज्ञान सत्ताधारी असो वा विरोधक दोघांना अवगत आहे. त्यामुळे आगामी निवडणुका लक्षात घेता समिती स्थापन करून पुन्हा एकदा शेतकऱ्यांना गाजर तर दाखवले नाही ना, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर निर्णय घेणे सत्ताधारी असो वा विरोधक दोघांच्याही विचारावर ठरणार आहे. त्यामुळे परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या या समितीचा अहवाल वेळोवर येईल अशी शक्यता कमीच आहे. शेतकऱ्यांना दिलासा देणारे निर्णय कागदावर राहतात आणि प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांच्या हातात पोहोचत नाही. त्यामुळे या समितीच्या स्थापनेने केवळ राजकीय गाजावाजा केला जात आहे. परंतु प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या जीवनात काही बदल होईल असे दूरवर दिसूत येत नाही. त्यामुळे समिती स्थापन करून शेतकऱ्यांची बोळवण केली तर भविष्यात शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा उद्रेक होईल आणि याला सत्ताधारी व विरोधक जबाबदार असणार यात दुमत नाही.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची अवस्था दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, कधी अवकाळी पाऊस अशा संकटांच्या चक्रव्यूहात अडकलेला शेतकरी हवालदिल झाला आहे. शेती ही जीवनाचा कणा असूनही, शेतकऱ्याला स्थैर्य देण्यात सरकारचे युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. गेल्या काही वर्षांत शेतकऱ्यांनी उत्पादन वाढवण्यासाठी खूप परिश्रम घेतले, परंतु शेतीमालाला बाजारभाव न मिळाल्याने त्यांची आर्थिक घडी विस्कटली आहे. पीक विमा योजनांच्या अंमलबजावणीत विलंब, बँकांचे कर्ज वसुलीचे दडपण, तसेच वाढते खत-औषधांचे दर ही संकटे अधिक तीव्र बनवत आहेत. त्यातच हवामान बदलामुळे पिकांची अनिश्चितता वाढली आहे.

आज ग्रामीण भागात अनेक शेतकरी जगण्याची लढाई लढत आहेत. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची आकडेवारी हे केवळ आकडे नसून, त्यामागे उद्ध्वस्त झालेली कुटुंबे आणि तुटलेल्या स्वप्नांची कहाणी दडलेली आहे. सरकारकडून मदतीच्या घोषणा होतात, परंतु त्या प्रत्यक्षात पोहोचायला वेळ लागतो. महाराष्ट्रातील शेतकऱ्याला खऱ्या अर्थाने दिलासा मिळावा, यासाठी स्थिर व हमीभावाची धोरणे, वेळेवर विमा परतावा, तसेच कर्जमाफीसोबत शाश्वत शेतीसाठी तंत्रज्ञानाचा वापर आणि बाजारपेठेतील थेट प्रवेश आवश्यक आहे.

# असहाय ग्रामीण भारताच्या आत्मसन्मानाची लढाई!

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी व इतर शेतकरी संघटनांनी मंगळवारी नागपूर-हैदराबाद महामार्गावर पासोडी येथे ठिय्या आंदोलन केले. या आंदोलनाच्या माध्यमातून बच्चू कडू यांनी मुख्यमंत्र्यांवर हल्लाबोल केला. यावरून पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा मुद्दा चर्चिला गेला. खरे तर, महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांच्या इतिहासात अशा अनेक वेळा आल्या, जेव्हा त्यांच्या अंगावरचा घाम, मेहनतीचा परमोच्च बिंदू असलेले पीक, बाजारभावाच्या, हवामानाच्या आणि धोरणांच्या चक्रव्यूहात हरवून गेले. आज पुन्हा एकदा नागपूर-हैदराबाद महामार्गावर पासोडी येथे शेतकऱ्यांनी ठिय्या देऊन ही वेदना जगासमोर मांडली आहे. बच्चू कडू, राजू शेट्टी आणि इतर शेतकरी नेते या आंदोलनाच्या अग्रभागी आहेत, पण प्रत्यक्षात या लढ्याचा चेहरा म्हणजे तो शेतकरी आहे, जो आपल्या मुलीच्या लग्नासाठी, पिकाच्या खतासाठी, बैलाच्या दाण्यासाठी आणि घराच्या छपरासाठी कर्ज घेतो आणि मग त्याच कर्जाच्या ओझ्याखाली जगणे हरवून बसतो. शासन दरवेळी सांगते की, कर्जमाफीमुळे अर्थव्यवस्थेवर ताण येतो, वित्तीय शिस्त बिघडते आणि करदात्यांचा पैसा खर्च होतो. पण हे सांगताना कोणत्याही अर्थतज्ञाने किंवा नेत्याने हे विचारले का, की त्या शेतकऱ्याने स्वतःच्या आयुष्याचा कर किती वेळा भरला आहे? पावसाच्या ओढाताणीशी झगडताना, बाजारातील दलालांच्या अन्यायाशी झगडताना आणि शेवटी आत्महत्येच्या टोकापर्यंत पोहोचताना त्याने कोणता अर्थसंकल्प मांडावा? बच्चू कडू आणि राजू शेट्टी यांची लढाई ही फक्त कर्जमाफीपुरती मर्यादित नाही. ही लढाई ग्रामीण भारताच्या आत्मसन्मानासाठी आहे. राज्य आणि केंद्र सरकारांच्या धोरणांनी, वर्षानुवर्षे, कृषी क्षेत्राला 'सबसिडीचा ग्राहक' म्हणून पाहिले, उत्पादक म्हणून नाही. शेतकऱ्यांना दिलेली कर्जमाफी ही अनेकदा निवडणुकीच्या काळात दिलेली प्रलोभनात्मक घोषणा असते. काही अंशी त्याचा फायदा होतोही, पण बहुतांश वेळा या घोषणा कागदावरच राहतात. गावागावात कर्जमाफीचे फॉर्म भरले जातात, पण प्रत्यक्षात माफ होतात फक्त काही सरकारी बँकांची खाती. सहकारी बँकांतील, खासगी सावकारांकडील किंवा वित्त संस्थांकडील कर्ज मात्र जसंच्या तसं राहते. मग शेतर्कयाला मिळते काय? फक्त एक राजकीय आश्वासन! खरी समस्या कजार्ची नाही, तर कर्जाच्या चक्रव्यूहाची आहे. ज्या अर्थव्यवस्थेत उत्पादन खर्च वाढतो, पण उत्पादनाचे मूल्य घटते, त्या ठिकाणी कर्जमाफी ही तात्पुरती गोळी ठरते. जमीन तयार करण्यासाठी, बियाणे, खत, औषधे, वीज, पाणी या सगळ्याचा खर्च वाढतो आणि बाजारात पिकाला मिळणारा भाव कमी होतो. शिवाय हवामान बदल, अनियमित पाऊस आणि सरकारच्या खरेदी धोरणातील उशीर या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून शेतकरी दिवाळखोरीकडे ढकलला जातो. जेव्हा तो कर्जमाफीची मागणी करतो, तेव्हा त्याला 'आळशी' किंवा 'अनुदानखोर' म्हणून दोष दिला जातो. हा अन्याय केवळ आर्थिक नाही, तर सामाजिक आणि नैतिकही आहे.

# तुमचीही तिशी आली आहे का जवळ, तर...




वयोमानानुसार तुम्ही तुमच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून अनेक बदल करावे लागतात. साधारण पंचविशी गेली की, तुमच्या सवयींमध्ये अधिक बदल होत जातात. तुमच्यावरील जबाबदाऱ्या वाढतात. त्यानंतर येणारा महत्वाचा काळ असतो तो म्हणजे तुमची तिशी.. आता तुमची तिशी आली म्हणजे तुम्ही म्हातारे झाला नाहीत. पण तरीही तुम्ही अशा वयोगटात आहेत जिथे तुमच्यावर कुटुंबाच्या अधिक जबाबदाऱ्या असतात. तुमचे करिअर असते. तुमच्या शरीरातही या वयोमानानुसार बदल होतात. त्यामुळे तुम्हीही तुमच्यात काही सवयींमध्ये बदल करणे आवश्यक असते.

- **आहारात करा बदल :** आता तुम्हाला सगळ्यात आधी जर काही बदल करायचा असेल तर तो तुम्हाला तुमच्या आहारात करायचा आहे. काही पदार्थ तुम्ही तिशी नंतर टाळायले हवे. त्यामध्ये खास करुन येते जंक फूड.. बर्गर, पिज्झा,चायनीज, कोल्ड्रींक अशा काही गोष्टी तुमच्या आरोग्यासाठी अधिक घातक ठरतात याचे कारण असे की, तिशीनंतर तुमची पचनसंस्था मंदावते. काही पदार्थ पचण्यास तुम्हाला अडथळा येतो. जर तुमचे पचन योग्य झाले नाही तर तुम्हाला अपचनाचा त्रास सतत होऊ लागतो. सतत पित्त होणे, मळमळल्यासारखे वाटणे असे त्रास तुम्हाला सतत होत राहतात. त्यामुळे तुम्हाला हे पदार्थ टाळता आले तर फारच उत्तम.
- **जेवणाच्या वेळा पाळणे महत्वाचे :** आता ज्या प्रमाणे तुम्हाला आहारामध्ये काही बदल करायचे आहेत. अगदी तसेच तुम्हाला जेवणांच्या वेळांमध्येही बदल करायचे आहेत. जर तुम्ही योग्यवेळी आहार घेतला तर त्याचा फायदा तुम्हाला नक्की जाणवेल. नाश्ता-दुपारचे जेवण-संध्याकाळचा नाश्ता-रात्रीचे जेवण यांच्या वेळा ठरवून घ्या. शक्यतो उशीरा काही खाण्याचे प्लॅन करु नका. रात्री ९.३० नंतर जर तुम्ही जेवत असाल तर तुम्हाला त्याचा त्रास नक्कीच होऊ शकतो. त्यामुळे तुम्ही शक्य असेल तितक्या जेवणाच्या वेळा पाळणेच चांगले.
- **गोड पदार्थांचे सेवन :** जर तुम्हाला खूप गोड खाण्याची सवय असेल तर ती सवय तुम्ही आताच सोडा. कारण तुम्ही गोड पदार्थांचे सेवन अति केले तर याचा परिणाम तुमच्या झोपेवर, तुमच्या पचनावर आणि तुमच्या आरोग्यावर होतो. शरीरीत आर्टीफिशिअल साखरेचे प्रमाण जास्त झाले तर तुम्हाला कॅन्सर बळावण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे तुम्ही गोडपदार्थांचे सेवन टाळलेले बरे. शिवाय या काळात जर तुम्ही गोडाचे अधिक सेवन करत असाल तर तुमच्या शरीरातील कॅलरीज वाढून तुमचे वजनही वाढू शकते. एकदा वजन वाढले की, तुम्हाला वजन कमी करण्यासाठी अनेक अडचणी येऊ शकतात. एकदा गोड खाण्याची सवय लागली की, त्यावर नियंत्रण मिळवणेही कठीण होऊन जाते.
- **कॅफेनचे अति सेवनही त्रासदायक :** कामाच्या अति ताणामुळे बरेचदा जास्त प्रमाणात कॉफीचे सेवन करतात. जर तुम्ही कॉफीचे अति सेवन केले तर तुमच्यावर वार्धक्याच्या अधिक खुणा दिसू लागतात. वयाच्या आधी वाधर्क्य येणे चांगले नाही. त्यामुळे तुम्हाला हेअरफॉल होण्याचीही शक्यता असतो.
- **दुधाचे सेवन टाळा :** दुधामुळे तुम्हाला आवश्यक असलेले कॅल्शिअम मिळते. हे खरे असले तरी तिशीनंतर तुम्हाला दुधाची फार आवश्यकता नाहीत. त्यामुळे तुम्ही दूध आणि दुग्धजन्यपदार्थांचे सेवन करु जास्त करु नका. दुग्धजन्य पदार्थ हे प्रक्रिया केलेले असतात. त्याचा त्रास तुम्हाला होऊ शकतो.
- **कॅन्ड फूड :** वयाच्या तिशीनंतर कॅन्ड फूड खाणे तुमच्या शरीरासाठी चांगले नाही. जर तुम्ही कॅन्ड फूड खात असाल तर ते खाणे आताच बंद करा. कारण या कॅन्ड फूडचा त्रास तुम्हाला होऊ शकतो. कॅन्ड फूडमध्ये पॅक केलेले पदार्थ अनेक प्रक्रिया केल्यानंतर पॅक केले जातात. त्यामुळे तुम्ही ते पदार्थ न खाल्लेलेच बरे असतात. त्यामुळे तुम्ही कॅन्ड फूड

# ॲल्युमिनिअमच्या भांड्यात जेवण करताय, मग एकदा वाचाच

पूर्वी जेवणासाठी ॲल्युमिनिअमच्या भांड्याचा सर्रास वापर केला जायचा. पण आता या भांड्यात जेवण करणे आरोग्यासाठी हानिकारक असे म्हटले जाते. तुम्हीही हे ऐकून ॲल्युमिनियमची भांडी वापरणे सोडून दिले असेल तर आज आम्ही तुम्हाला ॲल्युमिअमबाबत काही फॅक्टस सांगणार आहोत. ज्या तुम्हाला माहीत असणे गरजेच्या आहेत.त्याच्यानंतर तुम्हाला ॲल्युमिनिअमचा वापर करायचा की नाही हे ठरवायचे आहे. मग करायची का सुरुवात???

**म्हणून केली जाते ॲल्युमिनिअमच्या भांड्याची निवड**

ॲल्युमिनिअम आरोग्यासाठी हानिकारक असे अभ्यासातून सिद्ध झाल्यानंतर अनेकांनी आपल्या किचनमधून ॲल्युमिनिअमची भांडी काढून टाकली. पण आजही अनेकांच्या घरात ॲल्यमुमिनिअमची भांडी असतात. ॲल्युमिनिअमचा वापर जास्त करण्यामागेही काही कारणे आहेत. त्यापैकी पहिले कारण म्हणजे इतर कोणत्याही धातूच्या तुलनेत ते स्वस्त असते. इतकेच नाही तर टिकाऊ आणि उष्णता लवकर शोषून घेत असल्यामुळे गॅसही वाया जात नाही. म्हणून याचा वापर केला जातो.

**ॲल्युमिनिअम आहे का आरोग्यास घातक**

शास्त्रज्ञांनी केलेल्या अभ्यासानुसार ॲल्युमिनिअममध्ये असलेल्या शिशाचे प्रमाण आरोग्यास हानिकारक असते. त्याचा तातडीने कोणताही दुष्परिणाम तुमच्या शरीरावर जाणनत नाही. तर हा फरक कालांतराने जाणवू लागतो. म्हणूनच याला ह्व२'ङ्क६ स्र्ङ्क२ङ्कल्लह्र असे म्हटले जाते.ॲल्युमिनिअमसंदर्भात आणखी काही गोष्टी सांगायच्या म्हणजे ॲल्युमिनिअममध्ये सतत जेवण गरम करत राहिल्यामुळे त्यातील पोषण मूल्ये कमी होतात.

**ॲल्युमिनिअममुळे होऊ शकतो हा त्रास**

आता आपल्याला हे कळलं की, ॲल्युमिनिअममधील काही घटक अन्नातील पोषण मूल्ये कमी करतात. पण या शिवाय यामुळे अनेक आजार होण्याची शक्यता असते. ॲल्युमिनिअमधील अन्नाच्या सेवनामुळे हाडं कमजोर होतात. याशिवाय अस्थमा, मधुमेह, क्षयरोग आणि यकृताचे आजार बळावण्याची शक्यता असते.

**असा करा ॲल्युमिनिअमच्या भांड्याचा वापर**

आता अनेकांच्या घरात ॲल्युमिनिअमची भांडी असतील. कोणी वापरु नाही म्हटल्यावर तुम्ही ती वापरायची बंद करता. पण ती टाकून देण्याची अजिबात इच्छा होत नाही. जर तुमच्याकडेही बरीत अल्युमिनिअमची भांडी असतील तर तुम्ही त्या भांड्यांमध्ये जेवण शिजवू शकता. जेवण शिजवल्यानंतर ते दुसऱ्या भांड्यात काढून ठेवा. म्हणजे तुम्हाला त्याचा त्रास होणार नाही .

**या भांड्याचा बिनधास्त करा वापर**

आता तुम्हाला कळलं असेल की, ॲल्यमुनिअमच्या भांडयांचा जेवणातील वापर आरोग्यासाठी चांगला नाही. जर तुम्ही घरात नवीन भांडी घेण्याच्या विचारात असाल तर तुम्ही मातीची भांडी घेतल्यास उत्तम.. कारण मातीच्या भांड्यातून चांगली पोषकतत्वे तुमच्या अन्नात जातात. पण शहरांच्या ठिकाणी याचा वापर करणे शक्य होत नाही. त्यामुळे तुम्ही स्टेनलेस स्टील, लोखंड किंवा पितळेच्या भांड्याचा अगदी बिनधास्त वापर करु शकता. लोखंडाची भांडी वापरायला जड असतात. पण त्यातून मिळणारे लोह हे आरोग्यास चांगले असते. म्हणून आजही भाकऱ्या या लोखंडाच्या तव्यावर केल्या जातात.आताच्या घडीला स्टीलची भांडी जास्ती चालतात कारण ती हलकी आणि दिसायला छान असतात. त्यामुळे स्टेनलेस स्टीलची भांडी जास्त मिळतात. मातीची सरकुलही आता अनेक ठिकाणी मिळतात. आता जर तुमच्याकडे ॲल्युमिनिअमची जुनी भांडी असतील तर त्यात अन्न शिजवल्यानंतर दुसरीकडे काढून ठेवायला विसरु नका. शक्य असल्यास या भांड्याचा वापर टाळा. नवीन भांडी घेताना ॲल्युमिनिअमच्या भांड्याना नाही म्हणा.



# वाढते वजन, भूक आणि मेटाबॉलिजम नियंत्रणात आणण्यासाठी उपयुक्त गोलो डाएट



आपण आपली सततची बदलती लाईफस्टाईल सर्वात जास्त परिणाम करते ती आपल्या शरीरावर. वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी आता वेगवेगळ्या डाएटिंगचा आधार घेतला जातो. डाएटिंगच्या नावावर आता वेगन, किटो डाएट अशी वेगवेगळी डाएट आपण ऐकली आहेत आणि आपल्यापैकी काही जण हे डएट फॉलोदेखील करत असतील. पण असंच एक डाएट आहे ज्यामुळे तुमचे वाढते वजन, भूक आणि मेटाबॉलिजम हे नियंत्रणात राहील. या डाएटचं नाव आहे गोलो डाएट. आपल्यापैकी काही जणांना याबद्दल ऐकलं असेल तर काही जणांना याबद्दल कोणतीही माहिती नसेल. तर हे गोलो डाएट आपल्याला केवळ शारीरिक नाही तर मेंदूच्या तंदुरुस्तीसाठीही फायदेशीर ठरते.

गोलो डाएटमध्ये तुम्ही कॅलरी नियंत्रित करून शरीरातील मेटाबॉलिजम अधिक चांगले करण्यासाठी फायदा करून घेऊ शकता. यामुळे तुमच्या वाढत्या वजनावर नियंत्रण येईल आणि त्याशिवाय तुमची भूक ही नियंत्रणात राहील. मेटोबॉलिजम नीट असेल तर वजन वाढ होण्याचा त्रास होत नाही. वजन कमी करत असताना सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे मेटाबॉलिजमवर लक्ष देणं. गोलो डाएटमध्ये यावर जास्त लक्ष देण्यात आले आहे. पण बऱ्याच जणांना अजूनही या डाएटविषयी जास्त माहिती नाही. त्यामुळे त्याआधी गोलो डाएट म्हणजे नेमकं काय आहे हे आपण जाणून घेऊया. गोलो डाएटविषयी सर्व माहिती आम्ही तुम्हाला लेखातून देणार आहोत.

**गोलो डाएट म्हणजे काय?**

गोलो डाएट हे वेगवेगळ्या खाद्यपदार्थांचे मिश्रण आहे. आता तुम्हाला प्रश्न पडेल म्हणजे नेमकं काय? तर यामध्ये मांस, भाज्या आणि त्या फळांचा समावेश केला जातो जे बाजारामध्ये अगदी सहजरित्या उपलब्ध आहेत. या डाएटमध्ये तुम्हाला प्रोटीन, कार्ब्स, फॅट या सगळ्याचा समावेश करून घ्यावा लागतो. तुम्हाला अशा प्रकारचे हे गोलो डाएट फॉलो करायचे असते ज्यामध्ये तुमच्या शरीरातील साखर स्थिर राहील आणि तुमची भूक ही चाळवणार नाही. उदाहरणार्थ तुम्ही सकाळच्या नाश्त्यामध्ये दोन अंडी (प्रोटीनचे दोन युनिट्स), एक टोस्ट (कार्बचे एक युनिट), लोणी (फॅटचे एक युनिट) आणि हंगामी एखादे फळ (कार्बचे दुसरे युनिट) अशा गोष्टी खाऊ शकता. तुम्हाला या गोष्टींचा समावेश आपल्या रोजच्या आहारात करून घ्यायचा आहे. एकंदरीतच तुम्हाला तुमच्या शरीरामधील वजन आटोक्यात आणण्यासाठी योग्य आहाराचा समावेश करून घ्यायचा आहे. यालाच गोलो डाएट असं म्हणतात. वजन कमी करत असतानाही साखरेची पातळी व्यवस्थित राखण्याचं आणि हार्मोनल बॅलेन्स योग्य ठेवण्याचं काम गोलो डाएट करतं. तसंच जास्तीत जास्त निरोगी आहार घेण्यावर या डाएटमध्ये भर देण्यात आला आहे.

**शरीरावर काय होतो गोलो डाएटचा परिणाम**

गोलो डाएटमध्ये इन्शुलिन आणि रक्तप्रवाह व्यवस्थित राहून तुमची भूक, वजन आणि मेटाबॉलिजम व्यवस्थित राखण्यावर भर देण्यात येतो. सोप्या शब्दात सांगायचं झालं तर जेव्हा इन्शुलिन आपल्या शरीराला ऊर्जा देण्याचं काम करत नाही तेव्हा साखर आपल्या रक्तामध्ये तशीच राहाते आणि त्यामुळेच आपल्या शरीरामध्ये चरबी वाढू लागते आणि त्यामुळे वजनही वाढू लागतं. या गोलो डाएटमुळे रक्तामधील साखर आणि इन्शुलिनची पातळी योग्य राखण्याकडे अधिक लक्ष दिले जाते. यामुळे आपल्या शरीरामधील ऊजेर्चा योग्य उपयोग होतो. त्यामुळे त्याचा शरीरावर कोणताही वाईट परिणाम न होता, काही कालावधीनंतर तुम्हाला चांगला परिणामच दिसून येतो.

**वजन कमी करण्यासाठी उपयोग होतो का?**

योग्य रितीने हे गोलो डाएट तुम्ही फॉलो केले तर याचा नक्कीच वजन कमी करण्यासाठी उपयोग होतो. २६ आठवड्यांसाठी केलेल्या अभ्यासामध्ये गोलो डाएटचा वजन कमी करण्यासाठी उपयोग होतो हे सिद्ध करण्यात आले आहे. साधारणतः १४ किलो वजन या कालावधीमध्ये कमी झाल्याचेही सांगण्यात आले आहे. हे अजूनही जास्त प्रमाणात प्रसिद्ध झालेले नाही. पण हे परिणामकारक असल्याचे सांगण्यात येत आहे. आपल्या रोजच्या आयुष्यात काही महत्त्वाचे बदल केले आणि योग्य निरोगी आहार घेतला तर याचा उत्कृष्ट परिणाम होऊन वजन कमी करण्यात तुम्हाला नक्कीच यश मिळेल.

**गोलो डाएटचे फायदे :** गोलो डाएट हे पोषक तत्वांवर आधारित आहे आणि साखरेवर नियंत्रण आणि वजन आटोक्यात आणण्यासाठी याचा फायदा होतो. तुमचं पोषक तत्वाच्या बाबतीत जर ज्ञान कमी असेल तर हे डाएट करणं तुम्हाला योग्य आहे. कारण यामध्ये तुम्हाला योग्य आणि संतुलित आहार खावा लागतो. तसंच १-२ भागांमध्ये कार्ब्स, प्रोटीन्स, फॅट्स आणि भाज्या या सगळ्याचा समावेश तुमच्या जेवणात करणं गरजेचं आहे. त्यामुळे तुमचं खाण्यावरही नियंत्रण येतं आणि तुमची भूक नियंत्रणात राहून तुम्ही खाल्लेलं ताजं अन्न हे तुमच्या शरीराला योग्य प्रमाणात लागतं. त्यामुळे तुमच्या शरीरामध्ये चरबी साठत नाही. गोलो डाएटचा हा सर्वात मोठा फायदा आहे. भूक कमी झाल्याने वजनवार आपोआपच नियंत्रण येते. गोलो डाएटमध्ये भूकेवर योग्य प्रकारे नियंत्रण कसे ठेवयाचे यावर भर देण्यात येतो. त्यामुळे त्याचे सेवन नक्की कसे करायचे हेदेखील आम्ही तुम्हाला या लेखातून सांगणार आहोत. आठवडाभर तुम्ही हा डाएट प्लॅन कसा फॉलो करायचा आहे जेणेकरून तुमचे वजन वाढणार नाही आणि त्याशिवाय तुमचे मेटाबॉलिजमही व्यवस्थित राखले जाईल हे आम्ही तुम्हाला सांगत आहोत.

**पदार्थांचा समावेश :** गोलो डाएटमध्ये तुम्ही प्रोटीन, कार्ब्स आणि भाज्या यांचा अधिक समावेश करून घ्यायला हवा. तुम्ही पॅकेट फूड, साखर, अन्य प्रकारचे गोड पदार्थ, प्रोसेस्ड फूड या सगळ्याचा आपल्या रोजच्या खाण्यातून समावेश काढून टाकायला हवा. नेहमीच्या जेवणात तुम्ही चिकन, मासे, डेअरी फूड, सुका मेवा, अंडी, डाळ, हिरव्या भाज्या, फळं, बाजारात लवकर उपलब्ध होणाऱ्या भाज्या यासारख्या सगळ्या पदार्थांचा वापर करून घ्या. तसंच तुम्ही स्टार्चसाठी बटाटा, पालेभाज्या आणि प्रत्येक दिवशी किमान एक फळ याचा समावेश या गोलो डाएटमध्ये करून घेऊ शकता. यामुळे तुमची भूकही मिटेल आणि वजनही वाढणार नाही. तसंच सहसा ब्रेड आणि इतर बाहेरील तेलकट पदार्थ खाणं तुम्ही टाळा. घरातील जास्तीत जास्त ताजे पदार्थ खाण्यावर तुम्ही भर द्यायला हवा. त्यातही तुम्ही पौष्टिक पदार्थांवर अधिक भर देऊन गोड पदार्थ आणि तेलकट पदार्थ टाळण्याचा प्रयत्न करायला हवा.

# सांधेदुखीचा त्रास दूर करण्यासाठी करा



सांधेदुखीमुळे तुम्हाला जीवन जगणं अक्षरशः असह्य होऊ शकतं. कारण या दुखण्याचे तुमच्या संपूर्ण जीवनशैलीवर परिणाम होतात. साधं उठणं आणि बसणं या दोन क्रियाही व्यवस्थित करता येत नाहीत. सहाजिकच सांधेदुखी हे जगातील सर्वात मोठं दुखणं आहे असं तुम्हाला वाटू लागतं. बऱ्याचदा वैद्यकीय उपचार आणि औषधांचाही यावर काहीच परिणाम होत नाही. मात्र दररोजच्या या दुखण्यावर तुम्ही घरातील काही गोष्टी वापरून तुम्ही उपचार करू शकता. घरगुती उपचारांनी तुमची सांधेदुखी पूर्ण बरी नाही झाली तरी काही काळ तुम्हाला त्यापासून आराम नक्कीच मिळू शकतो. या घरगुती उपचारांचा तुमच्या आरोग्यावर कोणताच दुष्परिणाम होत नाही.

**दुखण्याच्या मुळावरच करा उपाय :** आर्युवेदानुसार आपल्या घरातच अशा अनेक नैसर्गिक गोष्टी असतात ज्यांचा वापर आपण दुखणे कमी करण्यासाठी करू शकतो. कोणत्याही दुखण्याचं मुख्य कारण असतं ते म्हणजे दुखऱ्या भागाच्या आत होणारा दाह. जर तुम्ही हा दाह कमी करू शकला तर तुमचे दुखणे हळूहळू कमी होते. वैद्यकीय उपचारांनीदेखील हा दाहच कमी करण्याचा प्रयत्न केला जातो. सांधेदुखीवर केलेल्या उपचारांमुळे सांध्यांमधील दाह कमी झाल्यामुळे जखडलेले सांधे मोकळे होतात आणि तुम्हाला तुमची दैनंदिन कामे करणं सोपं जातं. आहारात फळं, ताज्या भाज्या आणि भरपूर पाणी याचा समावेश करून तुम्ही नैसर्गिक पद्धतीने शरीरातील उष्णता अथवा दाह नियंत्रणात आणू शकता. पण तेवढंच पुरेसं नाही कारण तुम्हाला यातून लवकर आराम मिळायला हवा. काही स्वयंपाकातील काही नैसर्गिक घटक शरीराचा दाह कमी करण्यासाठी फायदेशीर ठरू शकतात. नैसर्गिक घटकांपासून तयार तेलाने मसाज केल्यास तुमच्या दुखऱ्या भागातील उष्णता कमी होऊ शकते. यासाठीच आम्ही तुम्हाला हा मसाज कसा करायचा आणि त्यासाठी कोणते पदार्थ वापरायचे ते शअर करत आहोत.

**मसाज ऑईलसाठी लागणारे साहित्य :** एक कप पाणी, वीस चमचे ऑलिव्ह ऑईल, दहा चमचे जाडे मीठ

**कसे तयार कराल मसाज ऑईल :** सर्व साहित्य एकत्र मिक्स करा आणि मीठ पूर्ण विरघळेपर्यंत ढवळत राहा. मीठ विरघळल्यावर ते मिश्रण एका स्प्रे बॉटलमध्ये भरून साठवून ठेवा. ज्यामुळे मसाज करताना तुम्ही याचा वापर करू शकता.

**मसाज कसा करावा :** प्रत्येकवेळी वापर करण्यापूर्वी स्प्रे बॉटल चांगली ढवळून घ्या. दुखऱ्या भागावर हे मिश्रण स्प्रे करा. काही मिनीटे हलक्या हाताने त्यावर मसाज करा. फार रगडून मसाज करू नका. दिवसभरात तुम्ही फक्त पंधरा मिनीटे हा मसाज करू शकता. चांगल्या परिणामासाठी मसाज करण्यापूर्वी गरम पाण्याच्या पिशवीने तो भाग शेकवा. ज्यामुळे त्या भागावरील त्वचेतील रोमछिद्रे मोकळी होतील आणि ते मिश्रण त्वचेमध्ये चांगले मुरेल. अशा पद्धतीने दररोज हा उपाय करून तुम्ही तुमची सांधेदुखी कमी करू शकता. ऑलिव्ह ऑईलमध्ये ॲंटिऑक्सिडंट असतात. ज्यामुळे तुमच्या सांधेदुखीतून तुम्हाला आराम मिळू शकतो. शिवाय मीठ हे निर्जंतूक असते त्यात सोडीयम, पोटॅशियम, मॅग्नेशियम, लोह, झिंक, तांबे, कॅल्शियम असे अनेक खनिज पदार्थ असतात. ज्यामुळे दुखऱ्या भागावरील दाह नक्कीच कमी होऊ शकतो. मात्र लक्षात ठेवा हा फक्त एक नैसर्गिक उपाय आहे. यामुळे तुमच्या सांधेदुखीतून तुम्हाला तात्पुरता आराम मिळेल. त्यामुळे सांधेदुखी पूर्ण बरी करण्यासाठी तुम्हाला या उपायासोबतच वैद्यकीय उपचार आणि औषधे घेणं गरजेचं आहे. वैद्यकीय उपचार न घेता हा उपाय करू नका.

# जेवणासाठी वापरत असलेल्या तेलाचा तुमच्या आरोग्यावर काय होतो परिणाम



हल्ली बाजारात इतक्या वेगळ्या प्रकारचे तेल मिळतात की, त्यांचे फायदे जाणून घेऊन आपण त्यांचा आहारात समावेश करतो. राईस ब्रॅन ऑईल, ऑलिव्ह ऑईल, सूर्यफुलाचे तेल, शेंगदाणा तेल , सोयाबीन तेल, मोहरीचे तेल असे जेवणासाठीच्या तेलाचे विविध पर्याय सध्या बाजारात आहे. प्रत्येक तेलाचे फायदे पाहूनच तुम्ही त्या तेलाची निवड करता. पण प्रत्यक्षात तुमच्या तेलाच्या निवडीवर तुमचे आरोग्य अवलंबून आहेत का ते आपण आज जाणून घेऊयात

**देशातील तेलाचा वापर :** आपल्या देशात तेलाचा सर्वाधिक वापर केला जातो. देशाच्या वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या प्रकारचे तेल वापरले जाते. अगदी फोडणीपासून ते पोळीपर्यंत अनेक जण तेलाचा वापर करतात. आता हे तेल अगदी राईसब्रॅन ऑईलपासून ते मोहरीच्या तेलापर्यंतचे असते. त्यामुळे काही अभ्यासातून एक गोष्ट जी प्रकर्षाने समोर आली आहे ती म्हणजे भारत हा असा देश आहे जो सर्वाधिक तेलाचा वापर करते. त्यामुळे त्यापासून होणारे त्रास भारतात अधिक आहे.

**तेलामध्ये असतो का फरक?**

आता तुम्ही म्हणाल की, आम्ही अमूक एक तेल वापरतो ज्यामध्ये कोलेस्ट्रॉल कमी आहे. त्यामुळे आम्ही सुरक्षित आहोत. तुम्ही असा विचार करत असाल तर तुम्हाला हे सांगायला आवडेल की, आपण सगळे रिफाईंड तेलाच वापर करतो. तेल रिफाईंड केल्यामुळे त्यातील अनावश्यक घटक कमी होतात. त्यामुळे तुम्ही कोणत्याही तेलाचा वापर केला तरी तुम्हाला त्याचे नुकसान होत नाही, असे एका अहवालातून समोर आले आहे. त्यामुळे तुम्ही किंवा इतर कंपन्या तेलांमध्ये भेदभाव करत असल्या तरी प्रत्यक्षात रिफाईंड तेलामध्ये तसा काही फरक नसतो हे शास्त्रज्ञांनी सांगितले आहेत. हा आता हा बदल तुम्हाला तेलांच्या चवींमध्ये हमखास जाणवेल. फक्त तेल तपासून घेताना त्यामधील फॅटची मात्रा तपासायची आहे. कोणत्याही तेलात फॅट हे २% पेक्षा जास्त असता कामा नये.

**तेलाचा वापर करा जपून :** आता तुम्ही कोणत्याही तेलाचा वापर करा हे जरी आम्ही सांगितले असले तरी तुमच्या शरीरातील कोलेस्ट्रॉल वाढणे, फॅट वाढणे, वजन वाढणे, हृदयविकाराचा त्रास होणे असे त्रास आपण तेलामुळे होतात हे ऐकले आहे ते अगदी खरे आहे. याचे कारण असे की, तेल कोणतेही वापरले तरी ते वापरण्याचे प्रमाणही योग्य असणे फारच आवश्यक असते. तुमचे जेवण तेलामुळे अधिक चमचमीत होते असे तुम्हाला वाटत असेल तर तुम्हाला त्याचा वापर अगदी मापात करायचा आहे. दोन ते तीन मोठे चमचे दिवसाला तुमच्या आहारात तेल आवश्यक असते. त्यामुळे तुम्ही त्यानुसार तुमच्या जेवणात याचा वापर करा. असं म्हणतात कच्चं तेल शरीरासाठी चांगलं असतं. तेल गरम झाल्यानंतर किंवा शिजल्यानंतर त्यातील घटक प्रसरण पावतात. मग ते अगदी कोणतंही तेल असो. तुम्हाला त्यातील फॅटचा त्रास होणारच आहे.

# घरातील केळी खराब होतात का?



केळी हे असे फळ आहे जे दीर्घकाळ टिकू शकत नाही. फळे चांगली राहण्यासाठी ती फ्रीजमध्ये ठेवतो. केळी खाल्ल्याने शरीरातील ऊर्जा वाढते तसेच केळीच्या प्युरीमुळे अप्रतिम त्वचा आणि सुंदर केस मिळण्यास मदत होते. तसेच केसांना रेशमी आणि चमकदार करण्यासाठी केळींची विषेश मदत होते. मात्र केळी फ्रीजमध्ये ठेवता येत नाहीत. अशात ती बाहेर ठेवल्यास काळी पडून खराब होतात. केळी लवकर खराब होऊ नये यासाठी 'या' टिप्स नक्की फॉलो करुन पाहा...

- कोणतीही फळे किंवा वस्तू फ्रीजला ठेवली तर ती जास्त दिवस टिकतात.
- सर्वसामान्यपणे खाण्या-पिण्याच्या गोष्टी फ्रेश ठेवण्यासाठी रेफ्रिजरेटरचा वापर केला जातो.
- पण केळं हे फळ याला अपवाद आहे.
- केळी कधीही फ्रीजमध्ये ठेवू नयेत. केळी फ्रीजमध्ये ठेवल्यास लवकर खराब होण्याची शक्यता असते.
- केळी खरेदी करून आणल्यावर त्यांच्या देठावर पेपर किंवा प्लास्टिक रॅप करावे.
- बाजारात केळीचे हँगर मिळते. त्यावर टांगल्याने केळी बराच काळ टिकतात.
- व्हिटॅमिन सी ची टॅबलेट पाण्यात विरघळून त्या पाण्यात केळी बूडवून ठेवावी. त्यामुळे केळी लवकर खराब होणार नाहीत.
- केळी कधीही फ्रिजमध्ये ठेवू नये. केळी नेहमी सामान्य तापमानातच ठेवावी.
- केळी वॅक्स पेपरने झाकून ठेवावी.
- पाण्यात सोडा घालून त्यात थोड्यावेळ भिजवून ठेवावे. नंतर ती केळी खोलीतल्या सामान्य तापमानात ठेवावे.
- त्वचेचं वॅक्सिंग करण्यासाठी ज्या वॅक्स पेपरचा वापर केला जातो.
- या पेपरचा वापर तुम्ही केळी फ्रेश ठेवण्यासाठीही करू शकता.
- वॅक्स पेपरमध्ये केळी गुंडाळून झाकून ठेवली, तर ती लवकर खराब होत नाहीत.
- केळी दीर्घ काळ टिकावीत यासाठी केळ्यांच्या फणीचं देठ प्लास्टिक किंवा सेलोटेपने गुंडाळून ठेवावं.
- या ट्रिकमुळेही केळी फ्रेश राहतात.

# कफ सीरपची बेकायदा विक्री

## कोकण विभागातील ९८ औषध विक्रेत्यांना एफडीएच्या नोटिसा

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

डॉक्टरांच्या प्रीस्क्रिप्शनविना कफ सीरपची विक्री करणाऱ्या कोकण विभागातील ९८ विक्रेत्यांना एफडीएने कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. यामध्ये ठाणे जिल्ह्यातील विक्रेत्यांची संख्या ५९ आहे. तसेच, कफ सीरपचे अनेक नमुनेही घेतले असून संशयावरून १९ लाखांहून जास्त किंमतीचा कफ सीरपचा साठा प्रतिबंधित केला आहे. या नमुन्यांचे अहवाल प्रलंबित असून अहवालानंतर संबंधितांवर पुढील कारवाई करण्यात येईल, अशी माहिती अन्न आणि औषध प्रशासनच्या (एफडीए) ठाण्यातील अधिकाऱ्यांनी दिली.

विषारी घटक असलेल्या कफ सीरपच्या सेवनाने राजस्थान आणि मध्यप्रदेशमध्ये बालकांचे मृत्यू झाल्यानंतर देशभरात खळबळ उडाली. या प्रकारानंतर राज्याच्या अन्न आणि औषध प्रशासन (एफडीए) विभागातील अधिकारी खडबडून जागे झाले आणि प्रशासनाने डॉक्टरांच्या प्रीस्क्रिप्शनशिवाय कफ सीरपची विक्री करू नका, अशी सर्व औषध विक्रेत्यांना विशेष सूचना केली. तसेच, एफडीएने औषध विक्रेत्यांसह कफ सीरप उत्पादकांची तपासणी करण्याची विशेष मोहीम हाती घेतली. एफडीएच्या कोकण विभागातही ही मोहीम नुकतीच राबविण्यात आली होती. या मोहिमेत अनेक औषधविक्रेते नियमांचे उल्लंघन करत असल्याचे आढळून आले.

ठाणे, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड या पाच जिल्ह्यांत करण्यात आलेल्या २१३ तपासण्यांमध्ये ९८ विक्रेत्यांनी डॉक्टरांच्या प्रीस्क्रिप्शनशिवाय औषधांची विक्री केल्याची बाब समोर आली. या सर्वांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्याची माहिती एफडीए अधिकाऱ्यांनी दिली. या कारवाईसह एफडीएने कोकण विभागातून कफ सीरपचे नमुनेही तपासण्यासाठी घेतले आहेत. या नमुन्यांची संख्या १२५ आहे. तसेच, संशयावरून १९ लाख ६५ हजार ४७९ रुपयांचा कफ सीरपचा साठा प्रतिबंधित केल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. ठाणे जिल्ह्यातून ६५ नमुने घेऊन १७ लाख ७९ हजार ६७३ रुपयांचा साठा प्रतिबंधित केला आहे.

**विक्रेत्यांची तपासणी**

जिल्हा - एकूण तपासण्या संख्या - किती विक्रेत्यांना नोटीस बजावल्या

- ठाणे --११३ --५९
- पालघर --३१ --१४
- रायगड --४२ --११
- रत्नागिरी --१९ --१०
- सिंधुदुर्ग --८ --४



पालघर जिल्ह्यातून ९, रायगड जिल्ह्यातून १२ (२० हजार ३३५ रुपयांचा साठा प्रतिबंधित) आणि रत्नागिरी जिल्ह्यातून १४ नमुने (६१ हजार ३४३ रु. साठा प्रतिबंधित) आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातून २५ नमुने घेऊन एक लाख ४ हजार १२८ रुपयांचा कफ सीरपचा साठा प्रतिबंधित केला आहे. अद्याप या नमुन्यांचे विश्लेषण अहवाल आले नसल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

### नमुने तपासणीला विलंब

अन्न आणि औषध प्रशासनाकडून औषधांसह अन्नाचे नमुने घेऊन हे संबंधित प्रयोगशाळेत चाचणीसाठी पाठवले जातात. परंतु, या नमुन्यांचे अहवाल लवकर येत नाहीत. काही वेळेला नमुन्यांच्या अहवालासाठी दोन ते तीन महिने प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे पुढच्या कारवाईला खीळ बसते. त्यामुळे नियमभंग नियमभंग करणारे मोकाट राहत असल्याचे बोलले जात आहे. परंतु, काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये नमुन्यांची लवकर चाचणी केल्याचे सांगितले जाते.

# मालाड ते ऐरोली प्रवास होणार सोपा! गोरेगाव-मुलुंड लिंक रोडच्या जुळ्या बोगद्याच्या कामाला गती

■मुंबई। प्रतिनिधी,

गोरेगाव-मुलुंड जोड मार्ग प्रकल्पांतर्गत गोरेगावच्या दादासाहेब फाळके चित्रनगरी परिसरात ५.३ किलोमीटर लांबीच्या, तिहेरी मार्गिका असलेल्या जुळ्या बोगद्याच्या बांधकामासाठी प्राथमिक उत्खनन कार्य जलदगतीने सुरू आहे. यासाठी आवश्यक असलेल्या दोन अत्याधुनिक बोगदा खनन संयंत्रांपैकी एका टीबीएमचे (टनेल बोअरिंग मशिन) सर्व घटक कार्यस्थळी दाखल झाले आहेत. ऑगस्ट २०२६मध्ये खोदकामास प्रत्यक्षात सुरुवात झाल्यानंतर, कामास गती येणार आहे. या प्रकल्पाची कामे निर्धारित कालमयार्देतच पूर्ण होण्यासाठी प्रयत्न करावे, असे स्पष्ट निर्देश मुंबई महापालिका अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले आहेत.

महापालिकेमार्फत राबविण्यात येणारा गोरेगाव-मुलुंड जोड मार्ग प्रकल्प हा एकूण चार टप्प्यांमध्ये प्रस्तावित आहे. टप्पा ३(ब)मध्ये गोरेगाव येथील दादासाहेब फाळके चित्रनगरी येथे ५.३ किलोमीटर लांबीच या, तिहेरी मार्गिका असलेल या बोगद्यासाठी लॉन्चिंग शाफ्ट उत्खनन जलदगतीने सुरू आहे. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) बांगर यांनी शुक्रवारी या कामाची प्रत्यक्ष स्थळपाहणी केली. त्यावेळा त्यांनी विविध निर्देश दिले.



**मालाड ते ऐरोली थेट प्रवास**

गोरेगाव-मुलुंड जोड मार्ग हा मुंबईमधील पूर्व आणि पश्चिम उपनगरांना एकमेकांशी जोडणारा चौथा प्रमुख जोडरस्ता आहे. उत्तर मुंबईतील वाहतुकीस याचा मोठा फायदा होणार आहे. विशेषतः दादासाहेब फाळके चित्रनगरी ते मुलुंडदरम्यान नवीन जोडमार्ग स्थापित होणार आहे. पश्चिमेकडील मुंबई किनारी रस्ता ते मालाड माईंडस्पेस आणि थेट ऐरोलीला हा मार्ग जोडला जाणार आहे.

अतिरिक्त आयुक्त बांगर यांनी प्रारंभी दादासाहेब फाळके चित्रनगरी परिसरातील जोश मैदान येथे भेट दिली. भूमिगत जुळ्या बोगद्याच्या बांधकामासाठी दोन अत्याधुनिक बोगदा खनन संयंत्रे आवश्यक आहेत. यापैकी एका बोगदा खनन संयंत्राचे सर्व घटक भाग जोश मैदान या ठिकाणी दाखल झाले आहेत. हे सुटे भाग जपानहून एकूण ७७ कंटेनरमधून आयात करण्यात आले आहेत. दुसऱ्या संयंत्राचे घटक भाग डिसेंबर २०२५ पर्यंत कार्यस्थळी दाखल होण्याची अपेक्षा आहे. या घटक भागांची पाहणी करत बांगर यांनी माहिती घेतली. या बोगदा खनन संयंत्राच या घटक भागांची जोडणी ऑगस्ट २०२६ पर्यंत पूर्ण केली जाणार आहे. तर, दुसऱ्या बोगदा खनन संयंत्राच्या घटक भागांची जोडणी ऑक्टोबर २०२६ पर्यंत पूर्ण केली जाणार आहे. त्यानंतर बोगद्याच्या खोदकामास प्रत्यक्षात सुरुवात होईल.

तिहेरी मार्गिका असलेल्या पेटी बोगद्याचे काम अभियांत्रिकीदृष्ट्या आव्हानात्मक स्वरूपाचे आहे. बोगदा खनन संयंत्रांच्या सहाय्याने एकूण सुमारे ५.३ किलोमीटर लांबीपर्यंत दुहेरी बोगद्यांचे खोदकाम करण्यात येणार आहे. पेटी बोगद्यासह हे एकूण अंतर सुमारे ६.६२ किलोमीटरपर्यंत वाढेल. प्रत्येक बोगद्याचा बाह्य व्यास सुमारे १४.४२ मीटर इतका असेल. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर, हे बोगदे मुंबई महानगर क्षेत्रातील आतापर्यंतचे सर्वांत मोठे ठरतील, अशी माहिती संबंधितांकडून देण्यात आली.

# मोखाड्यातील बोरशेतीमध्ये गॅस्ट्रोची मोठ्या प्रमाणावर लागण

■मोखाडा। प्रतिनिधी,

तालुक्यात खोडाळा प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येर्णाया बोरशेती येथील नागरिकांना शुक्रवारी रात्री १२ वाजेच्या दरम्यान जुलाब चालू झाले.जुलाबाचे रुग्ण झपाट्याने वाढले असून हा आकडा २० च्या घरात पोहोचला आहे.यातील काही रुग्ण खोडाळा प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार घेत असून दोघांना मोखाडा ग्रामीण रुग्णालयात संदर्भ सेवा देण्यात आली होती.मात्र तेथेही त्यांचे जुलाब थांबले नसल्याने त्यांना पुढे नाशिक जिल्हा



रुग्णालयात हलविण्यात आलेले आहे.तर खोडाळा प्राथमिक आरोग्य केंद्रातील काही रुग्णांनी वैयक्तिक विनंतीवरून खासगी रुग्णालयात उपचार घेणे पसंत केले आहे. दरम्यान या २० रुग्णांपैकी नितू झुगरे आणि करण शिद या दोघांना अधिक उपचारासाठी मोखाडा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.परंतु तेथूनही खबरदारीचा उपाय म्हणून त्यांना नाशिक जिल्हा रुग्णालयात उपचारार्थ पाठविण्यात आले आहे.तसेच काही रुग्णांनी विनंतीवरून खाजगी रुग्णालयात उपचार घेणे पसंत केले आहे.तर उर्वरित ६ रुग्णांवर आवश्यक ते उपचार करून त्यांची प्रकृती स्थिर झाल्यानंतर त्यांना घरी सोडण्यात आले असल्याची माहिती प्राथमिक आरोग्य केंद्र खोडाळा येथून मिळाली आहे.

"बोरशेती येथे रात्री पासूनच खबरदारीची उपाययोजना सुरु केली असून रात्रीच जलशुद्धीकरण करण्याची तजवीज करण्यात आली आहे.तसेच पाणी आणि संडास नमूने घेऊन तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात येणार आहेत.व शेवटचा रुग्ण बरा झाल्यानंतरही पुढील आठवडाभर आरोग्य कर्मचारी येथे अधिक खबरदारीचा उपाय अवलंबणार आहेत."

डॉ. भाऊसाहेब चत्तर, तालुका वैद्यकीय अधिकारी, मोखाडा

# चक्रीवादळामुळे लाखोंचे नुकसान... जिल्ह्यातील मच्छिमारांवर आर्थिक संकट

■मुरूड-जंजिरा। प्रतिनिधी,

महाराष्ट्राच्या सागरी किनाऱ्यावर धडकलेल्या 'मोंथा' चक्रीवादळामुळे रायगड जिल्ह्यातील मच्छिमार बांधवांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. समुद्रात मासेमारी करणाऱ्या बोटी किनाऱ्यावर नांगर टाकून उभ्या राहिल्याने मच्छिमारांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. यामुळे अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे.

या पार्श्वभूमीवर रायगड जिल्हा मच्छिमार मध्यवर्ती सहकारी संघ लिमिटेडच्या वतीने मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांना तातडीच्या आर्थिक मदतीसाठी निवेदन देण्यात आले आहे.

यावेळी संघाचे अध्यक्ष प्रल्हाद पाटील, उपाध्यक्ष मनोहर बैले, संचालक धनंजय देशमुख, सचिव राजेंद्र गावडे आदी मान्यवर उपस्थित होते. या निवेदनात म्हटले आहे की, राज्यात गेल्या काही महिन्यांपासून वादळी



वारे, मुसळधार पाऊस आणि चक्रीवादळाच्या सततच्या इशाऱ्यांमुळे मच्छिमार बांधवांना समुद्रात उतरणे शक्य झाले नाही. पारंपरिक मच्छिमारांची वाळत घातलेली मासळी भिजून खराब झाली असून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

या वर्षी ७ मेपासून सुरू झालेले वादळी वारे आजपर्यंत थांबलेले नाहीत. जवळपास सहा महिन्यांपासून पूर्ण क्षमतेने मासेमारी करता आलेली नाही. सर्व बोटी बंदरावर नांगर टाकून उभ्या आहेत, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा देण्याचा राज्य शासनाचा निर्णय ऐतिहासिक आहे. त्यामुळे मच्छिमारांनाही आता कर्ज, अनुदान, विमा संरक्षण आणि विविध कृषी योजनांचा लाभमिळेल. मात्र सध्याच्या संकटात शासनाने त्वरित आर्थिक मदत जाहीर करण्याची मागणी मच्छिमार संघटनांनी केली आहे.

**मच्छिमार कृती समिती २७ हजार कामगारांच्या उपजीविकेवर परिणाम**

महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीचे उपाध्यक्ष आणि रायगड जिल्हा मच्छिमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी सांगितले की, जिल्ह्यात तब्बल २,१३० सहा-सिलेंडर बोटी आहेत. प्रत्येक बोटीवर सुमारे १२ खलाशी आणि नाखवे काम करतात. म्हणजेच सुमारे २७,६९० कुटुंबे या व्यवसायावर अवलंबून आहेत. वर्षभरात कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते, मात्र यंदा पावसाने सर्व काही हिरावून घेतले आहे.

# माथेरानमधले ४०० घोडे झाले बेघर... पोलिस बंदोबस्तात मोठी कारवाई

## अश्वपाल बांधवांचा आक्रोश, कारवईमागचं कारण काय?

■रायगड। प्रतिनिधी,

माथेरान गिरीस्थान हिरवाईने नटलेले, मुंबई-पुणेकरां सहित देश विदेशातील पर्यटकांना आवडणारे पर्यटनस्थळ आहे, पण या सुंदर डोंगरमाथ्यावरील शांती आणि पर्यटनाचा ताल आज विस्कळीत झाला आहे. माथेरानच्या दस्तुरी नाका परिसरात आज प्रशासनाने संयुक्तरीत्या केलेल्या कारवाईमुळे तब्बल ४०० घोडे बेघर झाले असून, घोडे व्यवसायावर आपलं जीवन अवलंबून ठेवणाऱ्या अश्वपाल समाजात प्रचंड संताप उसळला आहे.

नगरपालिका आणि महसूल



विभागाने भूखंड क्र. 93 वर उभारण्यात आलेले घोड्यांचे प्लास्टिक शेड हटवले आहे. या जागेवर अश्वपाल समाज मागील अनेक वर्षांपासून तबेले उभारून घोड्यांची देखभाल करत होता. मात्र, वाहतूक कोंडी आणि पार्किंगच्या कारणावरून प्रशासनाने मोठ्या बंदोबस्तात ही कारवाई केली. परिणामी, माथेरानमधील मालवाहतूक, पर्यटन सेवा आणि स्थानिक व्यावसायिकांचे अर्थचक्रच ठप्प होण्याची भीती निर्माण झाली आहे.

माथेरान हे भारतातील एकमेव ह्यनो व्हेईकल झोनह्ल क्षेत्र आहे. येथे वाहनबंदी असल्याने, हॉटेल्ससाठी अन्नपदार्थ, बांधकाम साहित्य, जीवनावश्यक वस्तू तसेच पर्यटकांची मालवाहतूक ही पूर्णपणे घोड्यांवर अवलंबून असते. त्यामुळे घोड्यांचा व्यवसाय हा या प्रदेशाच्या अर्थचक्राचा अविभाज्य भाग बनला आहे. पण आता या घोड्यांना निवारा उरला नाही, त्यामुळे अश्वपाल समाज अक्षरशः उघड्यावर आला आहे.

# उपराजधानीत २० दिवसांत चार मातामृत्यू... लता मंगेशकर हॉस्पिटलमधील घटना, काय कारण?

**'त्या' औषधांचा वापर थांबविला**

या महिलांच्या ऑपरेशनसाठी वापरण्यात आलेल्या औषधांचा वापर तात्पुरता थांबविण्यात आला आहे. ज्या बॅचची ही औषधे होती, ती बेंच औषधांच्या साठ्यातून बाजूला काढण्यात आली आहे. अँटिबायोटिक, पेनकिलर अशा औषधांचा यात समावेश आहे. औषधांचे नमुने अन्न व औषध प्रशासन विभागाकडे (एफडीए) तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. या घटनांचा तपास सुरु असून नमुने एफडीएकडे पाठविण्यात येणार आहे, असे चौकशी समितीचे अध्यक्ष डॉ. गोगुलवार यांनी सांगितले. तर, 'नऊ महिन्यात एकही मृत्यू या हॉस्पिटलमध्ये झाला नाही. मात्र २० दिवसांत चार मृत्यू झाले आहेत. तपासात डॉक्टरांकडून हलगर्जीपणा झाला असे कुठेही आढळून आलेले नाही' असे लता मंगेशकर हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नितीन देवस्थळे यांनी सांगितले.

■नागपूर। प्रतिनिधी,

लता मंगेशकर हॉस्पिटलमध्ये २० दिवसांत चार मातामृत्यू झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी आरोग्य विभागाने समिती स्थापन केली आहे. ऑपरेशन थिएटर तातडीने बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. औषधांचे नमुने तपासणीसाठी अन्न व औषध प्रशासनाकडे पाठविण्यात आले आहेत.

मृत्यू झालेल्यांमध्ये हिंगण्यातील दोन, खापरीतील एक आणि गडचिरोलीतील एका महिलेचा समावेश आहे. पहिला मृत्यू ८ ऑक्टोबर




रोजी झाला. या कालावधीत काही मृत्यू झाले असून चौथा मृत्यू ३० ऑक्टोबर रोजी झाला. शासनाने या प्रकाराची गंभीर दखल घेत आरोग्य विभागाचे सहायक संचालक डॉ. श्रीराम गोगुलवार यांच्या अध्यक्षतेखाली चौकशीसाठी समिती नेमली आहे. या समितीत स्त्रीरोगतज्ज्ञ, जिल्हा बालसंगोपन अधिकारी, मेडिकल, मेयो येथील डॉक्टर अशा आठ जणांचा समावेश आहे. शुक्रवारी या समितीने हॉस्पिटलला भेट देऊन हॉस्पिटलची तपासणी केली.

### मृत्यूची तीन प्राथमिक कारणे

अचानक झालेल्या मातामृत्यूची कारणे शोधत असताना, प्रामुख्याने तीन प्राथमिक कारणे समोर आली आहेत. त्यात रक्त गोठण्याची प्रक्रिया थांबून अतिरिक्त रक्तस्राव होणे, किडनीवर सूज येणे, इतर अवयवांवर सूज येणे यांचा समावेश आहे, अशी माहिती समितीच्या सदस्यांनी दिली.

### संसर्ग की औषधोपचार?

मातामृत्यूची कारणे समोर आली असताना, त्यास संसर्ग जबाबदार आहे की, चुकीची औषधे याचा शोध समिती घेत आहे. सिझरनंतर हे मृत्यू झाले असल्याने ऑपरेशन थिएटरमधून हा संसर्ग पसरला असण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्याची सत्यता तपासण्यासाठी तीन दिवस नमुने घेतले जाणार आहेत.

# कल्याणमध्ये ३० वर्षांपासून राहणाऱ्या नेपाळी महिलेचा पर्दाफाश

## भारतीय कागदपत्रांसह मुंबई विमानतळावर घेतले ताब्यात

■नवी दिल्ली। प्रतिनिधी,

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी एका महिलेचा पदार्फाश केला आहे. शांती अर्जुनसिंग थापा नावाची ही महिला प्रत्यक्षात नेपाळची नागरिक असून ती गेली ३० वर्षे कल्याणमध्ये राहत असल्याचे समोर आले आहे. धक्कादायक म्हणजे परदेशी नागरिक असूनही तिच्याकडे भारतीय मतदार ओळखपत्र, आधार कार्ड आणि पॅन कार्ड मिळाले असून तिने महाराष्ट्रातील निवडणुकांमध्ये अनेकदा मतदानही केल्याचा खुलासा झाला आहे.

### समाधानकारक उत्तर न दिल्याने अधिकाऱ्यांना आला संशय

एफआयआरनुसार, ही महिला २४ ऑक्टोबर रोजी नेपाळमधील काठमांडूहून मुंबई विमानतळावर आरए-२०१ या विमानाने आली होती. नियमित इमिग्रेशन तपासणीदरम्यान तिने भारतीय मतदार ओळखपत्र (ळळद०८९०४२६) आणि बोर्डिंग पास सादर केला. तिच्याकडून प्रवासाचे उद्दिष्ट आणि राष्ट्रीयत्वाबाबत विचारले असता ती समाधानकारक उत्तर देऊ शकली नाही. तिच्या नावातील विसंगती आणि उत्तरांमुळे अधिकाऱ्यांना संशय आला आणि पुढील चौकशीसाठी तिला इमिग्रेशन विभागाच्या विंग इन्चार्जकडे सोपवण्यात आले.

चौकशीत उघड झाले की ही महिला प्रत्यक्षात नेपाळची नागरिक असून तिचे खरे नाव चंदा रेग्मी आहे. तिचा जन्म २५ नोव्हेंबर १९७६ रोजी नेपाळची राजधानी काठमांडू जिल्ह्यातील फुतुंग येथे झाला होता. ती गेल्या अनेक वर्षांपासून ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथे राहत आहे. तपासानुसार, चंदा १९९६ साली आपला पती अर्जुनसिंग थापा याच्यासह भारतात आली आणि ठाण्यातील डोंबिवली (पूर्व) येथील सागावजवळील बुद्ध विहार परिसरातील जय कमल रेसिडेन्सी येथे राहत होती. या दरम्यान तिने निवडणूक आयोगाला खोटी माहिती देऊन मतदार ओळखपत्र, आधार आणि पॅनकार्डसह भारतीय



ओळखपत्रे फसवणुकीने मिळवली. तिने या खोट्या भारतीय मतदार ओळखपत्राचा वापर करून भारत आणि नेपाळदरम्यान अनेक वेळा प्रवास केला होता, ज्यामध्ये २४ ऑक्टोबरचा अलीकडील प्रवासही समाविष्ट आहे. चौकशीदरम्यान तिने आपल्या नावावर असलेले नेपाळचे नागरिकत्व प्रमाणपत्रही सादर केले, ज्यामुळे तिचे नेपाळी नागरिकत्व निश्चित झाले.

### मतदार यादींच्या प्रामाणिकतेबाबत गंभीर प्रश्न

दुहेरी ओळख आणि फसवे कागदपत्रे सिद्ध झाल्यानंतर इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी तिला पुढील तपासासाठी सहार पोलिसांकडे सोपवले आहे. पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, या प्रकरणामुळे काही परदेशी नागरिक फसवणुकीने भारतीय मतदार म्हणून नोंदणी करत असल्याचे आणि सरकारी ओळखपत्रे मिळवत असल्याचे स्पष्ट झाले असून, यामुळे मतदार यादींच्या प्रामाणिकतेबाबत आणि दस्तऐवज पडताळणी प्रक्रियेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. सहार पोलिस या प्रकरणाशी संबंधित इतर आरोपींचा शोध घेत तपास करत आहेत. शांती उर्फ चंदा (वय ४९) हिच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इठर) च्या कलम ३३६(२), ३३६(३), ३४०(२) आणि ३१८(४) अंतर्गत फसवणूक, बनावट कागदपत्र तयार करणे आणि सरकारी कागदपत्रांसाठी खोटी माहिती देणे या आरोपांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ज्युनिअर कोण अन् सीनिअर कोण? नागपूरात वादातून महाविद्यालयीन विद्यार्थ्याची हत्या

■नागपूर। प्रतिनिधी,

नागपुरात एका महाविद्यालयीन विद्यार्थ्याची हत्या करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या दोन गटात झालेल्या वादातून विद्यार्थ्याची हत्या करण्यात आली.

नागपूरच्या पारडी पोलीस स्टेशन हद्दीत ही घटना घडली आहे. नूर नवाज हुसेन असं मृत विद्यार्थ्याचं नाव आहे. तर खिलेश्वर बीसेन असं मुख्य आरोपीचं नाव आहे. यामध्ये चार



नागपुरात एका विद्यार्थ्याच्या हत्येनंतर खळबळ उडाली आहे. पोलिसांनी याप्रकरणी तीन आरोपींना अटक केली आहे. आरोपींमध्ये एका अल्पवयीन मुलाचाही समावेश आहे.

आरोपी असून एक अल्पवयीन आहे.

नागपुरातील पारडी परिसरातील एच बी टाऊन परिसरात काल रात्री उशिरा दोन विद्यार्थ्यांच्या गटात भांडण होऊन एकाची हत्या झाल्याची घटना समोर आली आहे. सिनियर आणि ज्युनिअर असा वाद असल्याचं पोलीस सांगत आहेत.

मात्र हा वाद एका मुलीवरुन झाल्याचं बोललं जात आहे. बिसेन याच्यासोबत आणखी तीन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. या गुन्ह्यात एका अल्पवयीन मुलाचाही समावेश आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नूर आणि आरोपी यांच्यात ज्युनिअर सिनियर वरुन वाद सुरू होता. आणि हा वाद मिटवण्यासाठी एचबी टाऊन या ठिकाणी हे सगळे एकत्र आले होते. पण वाद मिटण्याऐवजी विकोपाला गेला. बिसेन याने चाकूने वार करत नूरला गंभीर जखमी केलं. त्याला मेयो हॉस्पिटलमध्ये नेलं असता त्याचा मृत्यू झाला.

या घटनेनंतर पोलीस तात्काळ तेथे हजर झाले आणि त्यांनी सर्व आरोपींना अटक करून चौकशी करत पुढील तपास करत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधीन राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com